https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -६८ | गुरुवार दि.१३ नोव्हेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-68 | Thursday, Dt.13 November 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# इच्छुक उमेदवारांकडून पैसे घेणारे दोन्ही राष्ट्रवादीसह काँग्रेस आय पक्ष झाले मालामाल ?

## सर्वसामान्य उमेदवारांसाठी ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना आणि भाजपा ठरला विनामूल्य पक्ष !



**बीड / वैभव स्वामी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वावटळ आता चांगलेच घोंगावत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया दहा तारखेलाच सुरू झाली आहे. इच्छुक उमेदवारांची अर्ज दाखल करण्यासाठी, कागदपत्र गोळा करण्यास दमछाक होत आहे. तर दुसरीकडे इच्छुक उमेदवारांकडून अनामत रक्कम घेणाऱ्यांमध्ये पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह काँग्रेस आय पक्ष हा मालामाल होणार असून सर्वसामान्य उमेदवारांसाठी मात्र ठाकरेंची शिवसेना, शिंदेंची शिवसेना, भारतीय जनता पार्टी, मनसेसह आम आदमी पार्टी विनामूल्य ठरली आहे. मात्र दुर्दैवाने ज्या पक्षाने इच्छुक उमेदवारांसाठी एक रुपया देखील फीस आकारले नाही त्यांच्याकडे तुल्यबळ उमेदवारांच्या रांगा लागल्या नाहीत.मात्र पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे सर्वाधिक संख्येने इच्छुक उमेदवारांच्या रांगा लागल्या असून त्या पाठोपाठ काँग्रेस पक्षाकडे देखील इच्छुक उमेदवारांनी पैसे भरून मागणी केल्यामुळे हे तीनही पक्ष उमेदवारी अर्ज अधिकृत दाखल करण्यापूर्वीच आर्थिक दृष्ट्या मालामाल झाले आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत नगरपालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सध्या वावटळी वादळाप्रमाणे घोंगावत आहे. तब्बल नऊ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत असल्याने इच्छुकांची गर्दी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. प्रभाग रचनेमध्ये मोठ्या प्रमाणात फेरबदल झाल्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांच्या स्वप्नांवर पाणी फिरले आहे. त्याचबरोबर

**(उर्वरीत पान २ वर)**

## अंबाजोगाई मध्ये महायुतीमध्येच थेट फाईट...

**शरद पवारांची राष्ट्रवादी आणि अजितदादांची राष्ट्रवादी यांची येथे झाली युती..?**

अंबाजोगाई नगरपालिका अंतर्गत महायुतीमध्येच थेट नगराध्यक्ष पदासाठी आणि नगरसेवक पदासाठी दुरंगी लढत होण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पार्टी तर्फे केज मतदार संघाच्या विद्यमान आमदार नमिता ताई मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा उर्फ काकाजी हे स्वतः उमेदवार म्हणून नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक आखाड्यात उतरणार असल्यामुळे या निवडणुकीकडे जिल्ह्याचेच नव्हे तर राज्याचे लक्ष वेधणार आहे. अंबाजोगाई नगरीवर सर्वाधिक काळ नगरपालिकेच्या माध्यमातून अधिराज्य करणारे राजकिशोर पापा मोदी हे अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असणार आहेत. त्यामुळे अंबाजोगाई नगरपालिकेत सर्वाधिक तुल्यबळ लढत होणार आहे. निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात पापा मोदी यांनी जादूची कांडी फिरवत आपल्या सोबत शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह महाविकास आघाडी मधील काँग्रेस पक्षाला देखील आपल्यासोबत ठेवण्यामध्ये यश मिळवलेले आहे. एकमेव अंबाजोगाई नगरपालिका अंतर्गत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सह काँग्रेस पक्ष देखील एकत्रित दिसणार आहे.दुसरीकडे त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार नंदकिशोर मुंदडा यांच्यासोबत अजूनही महायुतीमधील राहिलेला एकमेव शिंदे यांची शिवसेना उघडपणे सोबत नाही. असे असले तरी नंदकिशोर मुंदडा यांचा मतदारांशी असलेला थेट संपर्क आणि त्यांचे सामाजिक कार्यातील योगदान सुखदुःखात सहभागी होणारा नेता आणि ते स्वतः पहिल्यांदाच निवडणूक लढवत असल्यामुळे त्यांच्या बाजूने मिळणारी सहानुभूती या निवडणुकीत करिष्मा करू शकते ? उमेदवार निश्चितेनंतर निवडणुकीचे चित्र खऱ्या अर्थाने स्पष्ट होईल.

## बीड नगरपालिकेत सर्वच पक्षांचा स्वबळाचा नारा...

बीड नगरपालिकेमध्ये महायुती मधून अजित दादांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पावरफुल आहे. त्यांनी आपल्या पार्टीचा नगराध्यक्ष आणि सर्वाधिक नगरसेवक उमेदवार देण्याचे निश्चित केलेले आहे.वरिष्ठ पातळीवर भारतीय जनता पार्टी आणि शिंदे शिवसेनेला सोबत घेण्यासंदर्भात चर्चा सुरू असली तरीदेखील स्थानिक पातळीवर भारतीय जनता पार्टीने आणि शिंदे यांच्या शिवसेनेने स्वबळाची तयारी केलेली आहे. जर शिंदे यांची शिवसेना आणि भाजपा स्वबळावर लढली तर अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांची डोकेदुखी वाढणार हे नक्की. तर दुसरीकडे महाविकास आघाडी कडून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदासह सर्वाधिक नगरसेवक आपल्याच पक्षाचे निवडून आणण्यासाठी नियोजित पद्धतीने तयारी सुरू केलेली आहे. ठाकरेंची शिवसेना आज तरी स्वबळाची तयारी करत असली तरी देखील ऐनवेळी ते शरद पवारांच्या राष्ट्रवादीसोबत सामावून घेईल अशी शक्यता आहे. काँग्रेस पक्षाने मात्र आपला स्वबळाचा नारा आज तरी दिलेला आहे. भविष्यात जर महाविकास आघाडी सोबत काँग्रेस पक्ष गेला नाही तर काँग्रेस पक्षाची डोकेदुखी महाविकास आघाडीला निश्चित सहन करावी लागेल. काँग्रेसची ताकद नगण्य असली तरी देखील मतदारांमध्ये पक्षाबद्दल पुरोगामी विचारांचा पक्ष म्हणून क्रेझ असल्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवारांना दणका बसू शकतो अशी स्थिती बीड नगरपालिकेमध्ये सद्यस्थितीत तरी दिसून येत आहे. बीड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद अनुसूचित जातीच्या महिला प्रवर्गासाठी राखीव झाल्याने कोणता पक्ष कोणत्या उमेदवाराला संधी देतो ? याकडे सगळ्यांचेच लक्ष वेधलेले आहे. या मतदारसंघात मात्र आरक्षणामुळे गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्या अनेक नगराध्यक्षांचे मनसुबे धुळीला मिळाले आहेत.

### 1 गेवराई मध्ये महायुतीतच होणार निवडणुकीचा राडा

गेवराई नगरपालिका निवडणुकीमध्ये महायुतीमध्येच सरळ लढत होणार आहे.राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाविरुद्ध भारतीय जनता पार्टी अशी थेट लढत रंगणार आहे. या ठिकाणी माजी आमदार अमरसिंह पंडित व विद्यमान आमदार विजयसिंह पंडित या सत्ताधारी पक्षातील दिग्गज नेतृत्वाला स्थानिक पातळीवर भाजपाचे माजी आमदार लक्ष्मण अण्णा पवार आणि माजी आमदार बदामराव पंडित यांनी एकत्र येत गेवराई नगरीच्या गळ्यातील ताईत असलेले बाळराजे पवार यांना नेतृत्वाची संधी देत निवडणुकीच्या आखाड्यात उतरवले आहे. त्यामुळे या ठिकाणी महायुतीच्या उमेदवारांमध्येच सरळ सरळ तुल्यबळ लढत होईल.कोण कोणावर बाजी मारेल आणि गेवराई नगरपालिकेचे राजे होईल ? हे निवडणुकीनंतरच स्पष्ट होईल आज तरी गेवराई नगरपालिका निवडणुकीमध्ये बाळराजे पवार यांचे वर्चस्व दिसून येत आहे.

### 2 किल्ले धारूरमध्ये ही होतोय स्वबळाचा नारा...

किल्ले धारूर नगरपालिका अंतर्गत भारतीय जनता पार्टी आणि अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये सूत जुळून आले नाही. त्यामुळे या ठिकाणी भारतीय जनता पार्टी धारूर नगरीचे लोकप्रिय नगराध्यक्ष डॉक्टर स्वरूपसिंह हजारी यांना संधी देण्याची शक्यता आहे.तर अजित दादांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा बाळासाहेब जाधव यांना उमेदवारी देण्याची शक्यता असून शरद पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अर्जुन गायकवाड यांना उमेदवारी देण्याची शक्यता आहे. तर शिंदे शिवसेना देखील या ठिकाणी सुरेश गवळी यांना उमेदवारी देऊन स्वतंत्ररीत्या लढण्याची शक्यता नाकारता येत नाही. आज तरी किल्ले धारूर मध्ये प्रत्येक पक्ष स्वबळाचा नारा देत आहे. ऐनवेळी कसे राजकीय रंग बदलतात हे लवकरच स्पष्ट होणार आहे.

### 3 माजलगाव नगरपालिकेत देखील स्वबळाचाच नारा

माजलगाव नगरपालिका निवडणुकीमध्ये नगराध्यक्ष पद हे ओबीसी महिलांसाठी राखीव झाले आहे.नगराध्यक्ष पदासाठी अजित दादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे विद्यमान आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे पारडे सद्यस्थितीत तरी जड दिसून येत आहे. मात्र त्यांना महायुतीतीलच प्रमुख पक्ष असलेल्या भारतीय जनता पार्टीने उघडपणे विरोध केलेला असून भारतीय जनता पार्टीने स्वतंत्र उमेदवार देण्याचे निश्चित केले आहे. त्याचप्रमाणे महायुतीमधीलच शिंदे यांच्या शिवसेनेने देखील स्वबळावर निवडणूक लढवण्याचा निर्णय माजलगाव नगरपालिका अंतर्गत घेतला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने या ठिकाणी महायुतीमध्येच अंतर्गत फाईट होईल. तर दुसरीकडे महाविकास आघाडी मधील शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून तुल्यबळ उमेदवार रिंगणात उतरवला आणि या पक्षासोबत ठाकरेंची शिवसेना आणि काँग्रेस पक्ष एकजुटीने सोबत राहिला तर माजलगाव मध्ये महायुतीला अंतर्गत वादाचा फटका बसू शकतो आणि महाविकास आघाडीचे पारडे जड होऊ शकते असे चित्र आज तरी दिसून येत आहे.

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने आकारलेली फीस

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाने नगराध्यक्ष पदासाठी खुल्या प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांसाठी ३००० रुपये फीस तर राखीव प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांसाठी पंधराशे रुपये फीस आकारलेले होती. नगरसेवक पदासाठी सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी पंधराशे रुपये फीस आकारलेली होती. बीड नगरपालिका अंतर्गत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे नगराध्यक्ष पदासाठी १७ पेक्षा अधिक उमेदवार तर ३०० पेक्षा अधिक नगरसेवक पदासाठी उमेदवारांनी अधिकृत पक्षनिधी फीस भरून अर्ज दाखल केले आहेत.

### परळी मध्ये धनंजय मुंडे यांचाच बोलबाला

परळी नगरपालिका अंतर्गत आज तरी माजी मंत्री विद्यमान आमदार धनंजय मुंडे यांचेच वर्चस्व दिसून येत आहे. महायुती मधील भारतीय जनता पार्टी धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासोबत राहणार आहे. शिंदे यांची शिवसेना परळी नगरपालिका निवडणुकीमध्ये स्वबळाचा नारा देत असली तरी ऐन वेळेला ती धनंजय मुंडे यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस सोबतच राहील अशी शक्यता वर्तवली जात आहे. धनंजय मुंडे यांनी नगराध्यक्ष पदासाठी आपला उमेदवार म्हणून माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी यांचे नाव जाहीर केले आहे.दुसरीकडे धनंजय मुंडे यांचे समर्थक राहिलेले दीपक देशमुख यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात नुकताच प्रवेश केल्यामुळे ते महाविकास आघाडी तर्फे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार असतील अशी शक्यता आहे. या ठिकाणी काँग्रेस पक्ष स्वबळावर लढण्याच्या तयारीत आहे. ठाकरेंची शिवसेना या ठिकाणी काय भूमिका घेईल हे अजून स्पष्ट नाही. एकंदरीतच पहिल्याच टप्प्यात परळी नगरपालिकेत धनंजय मुंडे यांच्या महायुतीच्या उमेदवाराने उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वीच मुसंडी मारली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

### बीड जिल्ह्यात भाजपाला लागली घरघर तर अजितदादा पवारांच्या राष्ट्रवादीची वाढली टकटक...

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी बीड जिल्ह्याला भाजपाचा बालेकिल्ला केला होता. त्यांच्या पश्चात त्यांच्या वारसदार म्हणून पुढे आलेल्या पंकजाताई मुंडे यांना लोकनेत्या म्हणून बीड जिल्ह्यावर भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व अबाधित ठेवण्यामध्ये सपशेल अपयश आले आहे. बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिका अंतर्गत गेवराई आणि अंबाजोगाई वगळता एकाही नगरपालिकेमध्ये आपले वर्चस्व सिद्ध करता येणार नाही. या दोन नगरपालिकेमध्ये सुद्धा भारतीय जनता पार्टीचे किंवा पंकजा मुंडेंचे काहीही कर्तव्य नसून स्थानिक पातळीवर भारतीय जनता पार्टीचे उमेदवार हे तुल्यबळ असल्यामुळे त्या ठिकाणी भाजपा आपला विजय मिळू शकते. बीड जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीने आष्टीचे आमदार सुरेश धस यांच्याकडे निवडणुकीत बीड जिल्ह्याची अधिकृत जबाबदारी सोपवलेली असल्यामुळे त्यांची भूमिका या ठिकाणी प्रामुख्याने राहणार असल्यामुळे पंकजाताई मुंडे यांचे थेट वर्चस्व या दोन्ही ठिकाणी राहणार नाही. तर दुसरीकडे अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे बीड जिल्ह्यातील नेते धनंजय मुंडे यांना कितीही बदनाम बीड जिल्ह्यामध्ये केले असले तरी देखील त्यांच्याच नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेत अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्वाधिक वर्चस्व सिद्ध होईल अशी शक्यता आज तरी आहे.

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत रस्त्यांचे बोर्ड शासनाची दिशाभूल करणारे



### अभियंताचे दुर्लक्ष ग्रामस्थांच्या मुळावर - डॉ. गणेश ढवळे

बीड /प्रतिनिधी

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत बांधण्यात येणाऱ्या रस्त्यांची पारदर्शकता आणि दर्जा राखण्यासाठी शासनाने ठरवलेल्या नियमांनुसार माहिती फलकावर योजनेचे नाव, कामाचा प्रकार (नवीन रस्ता की सुधारणा), रस्ता कोणत्या दोन ठिकाणांना जोडतो, कामाची अंदाजित किंमत, निधी देणारी संस्था (महाराष्ट्र शासन), कामाची सुरुवात आणि पूर्ण होण्याची तारीख,

**(उर्वरीत पान २ वर)**

## गॅस ग्राहकांसाठी ई-केवायसी बंधनकारक




### ई-केवायसी न केल्यास अनुदान थांबणार; ओटीपीशिवाय सिलेंडर डिलिव्हरी नाही

बीड /प्रतिनिधी

गॅस कनेक्शन असलेल्या सर्व ग्राहकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया आता अनिवार्य करण्यात आली आहे. प्रदीप गॅस एजन्सीमार्फत ग्राहकांना तात्काळ ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गॅस सिलेंडर डिलिव्हरी घेताना ग्राहकांनी सर्वप्रथम ऑनलाईन बुकिंग करणे आवश्यक असून,

**(उर्वरीत पान २ वर)**

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

## संपादकीय

# दहशतवाद परतलाय...

राजधानी दिल्लीत भीषण बॉम्बस्फोट झाला आणि तोही अशा भागात जेव्हा दिवसाच्या प्रत्येक प्रहरी हा भाग गजबजलेला असतो. लालकिल्ल्याच्या ऐतिहासिक परिसरात भीषण बॉम्बस्फोट होऊन १४ जण ठार झाले, तर कित्येक जखमी झाले. या भागात पूर्वी दहशतवादी बॉम्बस्फोट घडवायचे. १४ वर्षांनंतर पुन्हा त्या भीषण आणि दहशतवादी दिवसांची आठवण ताजी झाली. गर्दीने गजबजलेला हा भाग आता मातम करण्यात बदलून गेलाय. दशकभराच्या कालावधीपासून सुखाने मार्गक्रमण करणाऱ्या लोकांच्या जीवनात या स्फोटाने उथलपुथल माजवली. लोक पुन्हा एकदा अशांत पर्व अनुभवत आहेत. या स्फोटाच्या अगोदर म्हणजे १० नोव्हेंबरला फरिदाबाद येथे एका काश्मिरी डॉक्टरला अटक करून त्याच्याकडून ३६० किलो स्फोटके जप्त करण्यात आली होती. या घटनेचा सदर बॉम्बस्फोटाशी संबंध आहे का, याचा तपास सुरू आहे. पुलवामा येथे झालेल्या स्फोटाशी या स्फोटाच्या सूत्रधाराचा संबंध असावा असा संशय आहे. एनआयए म्हणजे राष्ट्रीय तपास संस्थेने हा तपास आता हाती घेतला आहे आणि त्यातून नक्की काय ते समोर येईल. दहशतवाद्यांविरोधात आवश्यक ती पावले उचलली जात आहेत आणि यूएपीए म्हणजे पूर्वीचा टाडा कायदा दिल्ली परिसरात लागू करण्यात आला आहे. याचा अर्थ उघड आहे, तो म्हणजे दहशतवाद्यांना भारताची आगेकूच सहन होत नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा दहशतवादाचा मार्ग अवलंबला आहे. पण हा भारत मोदी यांचा आहे. त्यामुळे येथे जशाला तसेच उत्तर दिले जाते.

'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारताने हे दाखवून दिले आहे. त्यामुळे आता पाकिस्तानने भारताला पुन्हा आपण दहशतवादी हल्ले करून जेरीस आणू शकतो हे विसरून जावे कारण आता निषेधाचे पत्रक काढून शांत बसणारे सरकार नाही. आज वेगवेगळ्या वर्तमानपत्रांत या हल्ल्यानंतर जी छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत त्यावरून हे लक्षात येते, की दहशतवाद्यांनी स्फोट घडवल्यावर सर्वत्र अफरातफरीचे आणि गोंधळाचे वातावरण होते. पण सर्वच घटनांनंतर असेच घडते. या स्फोटानंतर जी बातमी येत आहे ती जास्तच धोकादायक आहे, ती म्हणजे आयसी ८१४ च्या अपहरणांतर दहशतवाद्याची अदलाबदल झाली. त्यानंतर असलेली जैश-ई-अहमद ही संघटना या स्फोटामागे असावी का, याचा विचार सुरू आहे. लालकिल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटामागे तीन पुरुष आणि एक महिला होत्या.

## निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**बीड /प्रतिनिधी**

**बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.**

हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बॅकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा.
जीवन प्रमाण या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने देखील हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल. निवृत्ती वेतनधारक काही कामानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल.

---

Dainik Samarth RajYog Date : 13 /11/2025

**PUBLIC NOTICE OF NAME CHANGE**

I HEREBY DECLARE THROUGH THIS PUBLICATION THAT MY NAME HAS BEEN CHANGED

**OLD NAME :** SHAIKH MUMTAZ BEGAM
**NEW NAME:** MUMTAJ BEGAM NAWAB SHAIKH
ADDRESS: NAIKWADI MOHALLA AMBAD,AMBAD, DIST JALNA
PIN CODE: 431204
MOBILE NO.: 8421519611

**THIS DECLARATION IS MADE FOR ALL LEGAL PURPOSES.**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-६९१ दि.०७.१०.२०२५**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **सुधाकर जिजाभाऊ मानमोडे, रा.पराडा, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | कार्तिक सुधाकर मानमोडे | मुलगा | ०३.०१.२०१२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.
तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी
आज दिनांक- ०७/१०/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**जाहीर प्रगटन**
**मा. ३रे सहदिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात**
**(एस एस परिहार यांचे समक्ष )**
**किरकोळ दिवाणी अर्ज नं. २२५ / २०२५**
**शालन वि निरंक निशाणी क्र. ६**
**अर्जदार :-१. शालन गुलाब बुर्ले, वय ६४ धंदा घरकाम**
**२. हरेश गुलाब बुर्ले, वय ३३ धंदा व्यापार**
**३. अक्षण्य गुलाब बुर्ले, वय ३१ धंदा व्यापार**
**रा. कावंदी गल्ली अंबड, ता. अंबड जि. जालना**
**विरुध्द**
**गैरअर्जदार:निरंक.**
**विषय:- मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ व ७ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

याद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, ज्याअर्थी अर्जदार यांनी विधीज्ञ श्री. के एन शर्मा यांचेमार्फत सदरचा अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदाचे कलम २ व ७ प्रमाणे अर्जदारास वारसा हक्क प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केलेला असून सदरील अर्जानुसार अर्जदार हे वरील ठिकाणी राहणारा आहे. तसेच मयत गुलाब नेमीनाथ बुर्ले यांची अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहेत व अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच गुलाब नेमीनाथ बुर्ले यांचा दि. ०९/१०/२०२५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच मयताचे कायदेशीर मुळ वारस आहे. अर्जदारांशिवाय अन्य इतर कोणीही वारस नाही. मयत गुलाब नेमीनाथ बुर्ले यांच्या नंतर शासकीय व निमशासकीय कामासाठी तसेच विज जोडणी, तसेच नळ जोडणी सार्वजनीक बांधकाम उपविभग कार्यालय, तहसील कार्यालय नगर परिषद, ग्रामपंचायत कार्यालय, भुमी अभीलेख कार्यालय अशा सरकारी कार्यालयातील नोंदी हया वारसांने अर्जदाराच्या नावे करणे असल्याने मयत यांचे वारस असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेकरिता सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.
त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसात स्वतः किंवा वकिलामार्फत आपला आक्षेप असल्यास सदर आक्षेप नोंदवावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व कोणाचाही काही आक्षेप नाही, म्हणून अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्राचा निकाल देण्यात येईल.
आज दिनांक ११.११.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**वरिष्ठ लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**अधीक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर,
अंबड जि.जालना

---

# बालपणाचे संस्कार अनंत काळ टिकतात, शिक्षणातून सुसंस्कृत पिढी घडली पाहिजे - जी. एम. भोले

## वाचाल तर वाचाल व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद जयंती शिक्षण दिनम्हणून उत्साहात संपन्न



बीड /प्रतिनिधी
व्यक्तिविकास,समाज आणि राष्ट्रघडवण्याची परिवर्तनशील प्रक्रिया म्हणेज शिक्षण आहे. ज्ञान मिळवण्या करिता शिक्षणाची गरज आहे. त्याकरिता पुस्तकांच्या,ग्रंथाच्या सहवासत राहून ज्ञान मिळविण्याकरिता बालपणीच महापुरुषांची जीवन चरित्र पुस्तके, वैज्ञानिक दृष्टीकोन पुस्तके,मुलांच्या हातात देणे गरजेचे आहे असे प्रतिपादन जी. एम भोले यांनी केले.

हेच ध्येय समोर ठेऊन वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाने भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांची जयंती ;शिक्षण दिन म्हणून खेमाडे वस्ती धानोरा रोड येथे संपन्न करून ४१ व्या वाचाल तर वाचाल च्या केंद्राचा प्रारंभ केला व भारताचे पहिले शिक्षण मंत्री मौ. अबुल कलाम आझाद यांना जयंती दिनी वाचनालय व महामानव अभिवादन ग्रुप तर्फे अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी से. नी. सी ई ओ बनसोडे पी. व्ही. तर महामानव अभिवादन ग्रुप चे अध्यक्ष जी एम भोले, समाजसेवक राजू जोगदंड, प्रशांतजी वासनिक, काशिनाथ वाघमारे, डी. एम राऊत, यांची प्रमुख उपस्थिती होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ड तेजस वडमारे यांनी केले तर प्रस्ताविक आयु राजू जोगदंड यांनी करून शिक्षणाने पुढे गेलेल्यांनी वाड्या वस्ती वर राहणाऱ्या व शिक्षणापासून दूर असणाऱ्या मुलांना मुख्य प्रवाहात आनण्या करिता सर्वोतोपरी प्रयत्न करून समाजाची सेवा करणे कसे गरजेचे आहे हे स्पष्ट केले. ह्या प्रसंगी वाचाल तर वाचाल वाचनालया तर्फे नियोजित बुद्ध विहार कपिलवस्तू खेमाडे वस्ती धानोरा येथे४० पुस्तकांचा संच विध्यार्थी व पालकांकरिता आयु. छाया राजेंद्र खेमाडे यांना मान्यवरांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. ह्या पुस्तकांचा पुरेपूर फायदा घ्यावा असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष डी. जी. वानखेडे यांनी केले.जेष्ठ महिला साळूबाई खेमाडे, मथुराबाई साबळे यांना त्यागमूर्ती माता रमाई व राष्ट्रमाता जिजाऊंचे जीवन चरित्र पुस्तक गुलाब पुष्प देऊन तर जेष्ठ नागरिक बाजीराव खेमाडे यांना सुभेदार रामजी बाबा यांचे पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला. महामानव अभिवादन ग्रुप तर्फे महापरीनिर्वाण दिनी मिळालेल्या दानातून २७ विद्याथ्यांना शालेय साहित्य (वही, पेन )वाटप करण्यात आले. ह्या प्रसंगी प्रशांत वासनिक यांनी विद्याथ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष यांनी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकाचे सामुदायिक वाचन केले.अध्यक्षीय समारोप पी. व्ही बनसोडे यांनी केला.

कार्यक्रमाचे आभार ड राजेश शिंदे यांनी मानले.कार्यक्रमास जी. प शिक्षिका नाईकवाडे (इंगोले ), साळूबाई खेमाडे, आशाबाई खेमाडे, सारिका खेमाडे, रेखा खेमाडे, कलावती खेमाडे, कावेरी खेमाडे तेजस्विनी उबाळे, रमेश खेमाडे, सुरेखा खेमाडे, व परिसरातील बहुसंख्य पालकांची व विध्यार्थ्यांची उपस्थिती होती.

---

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९२५/२०२५**
**बाजीराव प्रभाकर आदमाने विरूध्द निरंक**
**(मार्फत - ॲड. एस.एम.शेंबडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे भागुबाई भ्र.आश्रुबा आदमाने हे दि.०२.०९.२०२२ रोजी लोळदगांव ता.गेवराई जि.बीड येथे मयत झाले/ झाल्या आहेत. खालील प्रमाणे अर्जदार नामे-
१.बाजीराव पि.प्रभाकर आदमाने वय-५३ वर्षे, रा.लोळदगांव ता.गेवराई जि.बीड
२. अप्पा पि.प्रभाकर आदमाने, वय-४९ वर्षे, धंदा-शेती, रा.सदर
यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.
त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत भागुबाई भ्र.आश्रुबा आदमाने चे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.
आज दिनांक. १०/११/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख १५/१२/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

---

# सौताडा गणात नागेश पाटोळे राष्ट्रवादी पक्षाकडून इच्छुक

सौताडा /प्रतिनिधी
बीड जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर झाल्या असून लवकरच आचारसंहिता लागणार आहे.त्यामुळे जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणात अनेक उमेदवारांच्या नावांची चर्चा होत असतानाच पाटोदा तालुक्यातील सौताडा पंचायत समिती गणासाठी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षातर्फे निष्ठावान शिलेदार व सक्षम उमेदवार नागेश पाटोळे यांची चर्चा जोर धरू लागली आहे.



नागेश पाटोळे हा तरुण राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षासाठी सातत्याने काम करणारा कार्यकर्ता असून सौताडा पंचायत समिती गणा साठी सक्षम उमेदवार असून हक्कदार असल्याने अशा निष्ठावंत कार्यकर्त्याला राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळेल याची खात्री शरद पवार साहेबावर व तुतारी वाजवनाऱ्या माणसांवर प्रेम करणारे मतदार आणि कार्यकर्त्याची आहे.

---

पान १ वरुन...

**इच्छुक उमेदवारांकडून ..**

आरक्षणामुळे सुद्धा मोठ्या प्रमाणात इच्छुक उमेदवारांना पायबंध व्हावे लागले आहे.बीड जिल्ह्यामध्ये ११ तालुक्यांपैकी सहा नगरपालिकांच्या निवडणुका होत आहेत. यामध्ये प्रामुख्याने बीड नगरपालिकेत सह गेवराई नगरपालिका, माजलगाव नगरपालिका, परळी नगरपालिका, अंबाजोगाई नगरपालिका आणि किल्ले धारूर नगरपालिकेची निवडणूक होऊ घातली आहे. निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक उमेदवारांची तोबा गर्दी झाली आहे. अनेक वर्षापासून नगरसेवक, नगराध्यक्ष होण्यासाठी ज्यांनी ज्यांनी गुडघ्याला बाशिंग बांधले होते ते आता निवडणुकीच्या आखाड्यात नाचायला उतरले आहेत. मतदार आता त्यांना कशा पद्धतीने नाचवतो आणि किती डोक्यावर घेतो का पायाखाली घेतो हे मतदाना नंतर स्पष्ट होईल. सद्यस्थितीत तरी महाराष्ट्रामध्ये शरदचंद्र पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि अजित दादा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी ही इच्छुक उमेदवारांच्या मानधनावर मालामाल झाली आहे. त्यानंतर महाराष्ट्रात काँग्रेस आय पक्षाने देखील इच्छुक उमेदवारांकडून स्वीकारलेल्या पक्षनिधीतून मालामाल झाल्याची स्थिती स्पष्ट होत आहे.महाराष्ट्रातील नामांकित राजकीय पक्षापैकी केवळ या तीन राजकीय पक्षांनी इच्छुक उमेदवारांकडून अधिकृत उमेदवारीसाठी पक्षनिधी स्वीकारलेला आहे.यामध्ये सर्वाधिक रक्कम ही काँग्रेस आय पक्षाने आकारलेली होती. जो की पक्ष सर्वसामान्य जनतेचा पक्ष म्हणून उर बडवतो त्या पक्षाने नगराध्यक्ष पदासाठी खुल्या प्रवर्गासाठी ५००० आणि मागास प्रवर्गासाठी २५०० रुपये फीस आकारलेली होती. नगरसेवक पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी २००० आणि राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी १००० रुपये फीस आकारलेली होती. बीड जिल्ह्यातील सहा नगरपालिकेंपैकी काँग्रेस पक्ष बीड आणि परळी वैजनाथ येथे स्वबळाचा नारा देत आहे. इतर ठिकाणी अतिशय तुरळक प्रमाणात निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. सहा नगरपालिके पैकी इच्छुकांची गर्दी काँग्रेस पक्षाकडे फारशी झाली नाही. त्यामुळे सर्वाधिक निधी आकारलेला असला तरी देखील इच्छुक उमेदवारांकडून बीड जिल्ह्यात मालामाल होण्याची परिस्थिती काँग्रेस पक्षाची झालेली दिसून आली नाही. दुसरीकडे मात्र बीड जिल्ह्यात अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे इच्छुक उमेदवारांची सर्वाधिक तोबा गर्दी सर्व सहा नगरपालिका अंतर्गत दिसून आली. त्या खालोखाल शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे सुद्धा सर्वाधिक इच्छुक उमेदवारांनी गर्दी केली. त्यामुळे बीड जिल्ह्यात खऱ्या अर्थाने पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने इच्छुक उमेदवारांकडून प्राप्त केलेल्या उमेदवार निधीमधून हे

पान १ वरुन...

दोन्ही पक्ष मालामाल झाले असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

काँग्रेस पक्षाने अशी आकारली होती उमेदवारांसाठी फीस

सर्वसामान्यांच्या हक्काचा पक्ष म्हणून उर बडून घेणाऱ्या काँग्रेस आय पक्षाने इच्छुक उमेदवारांसाठी सर्वाधिक फीस आकारलेली होती. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून ५ हजार रुपये तर राखीव प्रवर्गातील उमेदवारांकडून अडीच हजार रुपये फीस ठेवली होती.तर नगरसेवक पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना २ हजार रुपये आणि राखीव प्रवर्गातील नगरसेवक पदासाठी १००० रुपये फीस आकारलेली होती.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांनी आकारलेली फीस

अजितदादा पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने इच्छुक उमेदवारांकडून नगराध्यक्ष पदासाठी खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकडून २ हजार रुपये आणि राखीव प्रवर्गातील नगराध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवारांकडून १ हजार रुपये फीस आकारलेली होती. तर नगरसेवक पदासाठी सर्व प्रवर्गांसाठी एक हजार रुपये फीस आकारलेली होती. या पक्षाकडे बीड नगरपालिके अंतर्गत नगराध्यक्ष पदासाठी २५ पेक्षा अधिक उमेदवार आले होते तर नगरसेवक पदासाठी २५० पेक्षा अधिक उमेदवारांनी अधिकृत फीस भरून अर्ज दाखल केलेले आहेत.

**गॅस ग्राहकांसाठी....**

डिलिव्हरी बॉयला ओटीपी दाखवणे बंधनकारक आहे. ओटीपी न दिल्यास सिलेंडर डिलिव्हर केला जाणार नाही, अशी माहिती एजन्सीने दिली. तसेच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतील लाभार्थ्यांनाही ई-केवायसी करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे. अन्यथा शासनाकडून मिळणारे अनुदान थेट त्यांच्या बँक खात्यात जमा होणार नाही. ई-केवायसीसाठी ग्राहकांना आधार कार्ड, लिंक केलेला मोबाईल नंबर, गॅस कनेक्शन नंबर आणि बँक खात्याची माहिती आवश्यक आहे. ही माहिती ऑनलाईन किंवा थेट एजन्सीमध्ये जमा करता येईल.

मिस्ड कॉल' देऊन गॅस बुकिंग करा

ऑनलाईन गॅस सिलेंडर बुकिंगसाठी ग्राहक ८८ ८८ ८२ ३४ ५६ किंवा ९४ ९३ ६० २२ २२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊ शकतात. गॅस सिलेंडरची डिलिव्हरी घेताना ओटीपी दाखवल्याशिवाय सिलेंडर मिळणार नाही. यासाठी संबंधित मोबाईल नंबर आधी एजन्सीमध्ये रजिस्टर असणे आवश्यक आहे.

'मेंडेटरी इन्स्पेक्शन' सुरू, ग्राहकांनी पूर्ण सहकार्य करावे

गॅस कंपनीतर्फे 'मेंडेटरी इन्स्पेक्शन' सुरू असून एजन्सी चे अधिकारी, कर्मचारी

पान १ वरुन...

घरपोच तपासणीसाठी भेट देणार आहेत. ग्राहकांनी तपासणीवेळी पूर्ण सहकार्य करावे, असे एजन्सीने आवाहन केले आहे. तांत्रिक किंवा संपर्कासंबंधी अडचणी असल्यास ग्राहकांनी प्रदीप एजन्सी, सावतामाळी चौक, सटवाई मैदान रोड येथे भेट देऊन आवश्यक माहिती घ्यावी असे ही आवाहन प्रदीप गॅस एजन्सीच्यावतीने करण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री ग्रामसडक..**

तसेच संबंधित अभियंता व कंत्राटदारांची माहिती नमूद करणे बंधनकारक असते.

यामुळे ग्रामस्थांना रस्त्याच्या देखभाल कालावधीबाबत आणि कामाच्या गुणवत्तेबाबत स्पष्ट माहिती मिळते. परंतु बीड जिल्ह्य ात या नियमांचे मोठ्या प्रमाणात उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणे अंतर्गत बांधण्यात येणाऱ्या अनेक रस्त्यांवर माहिती फलकावरील दिनांक आणि वास्तव कामामध्ये तफावत दिसते.

काही ठिकाणी काम सुरू झाल्याची तारीख दोन वर्षांपूर्वीची आणि पूर्ण झाल्याची तारीख वर्षभरापूर्वीची दाखवण्यात आली आहे, तर प्रत्यक्षात सध्या त्या रस्त्यांचे काम सुरू आहे. अशा प्रकारे दुरुस्ती कालावधीत दोन वर्षांचा फरक निर्माण करून कंत्राटदार व अभियंते रस्त्याची जबाबदारी टाळतात.रस्ता खराब झाल्यानंतर ग्रामस्थ दुरुस्तीची मागणी करतात तेव्हा कंत्राटदार म्हणतात दुरुस्ती कालावधी संपला आहे, आता जबाबदारी प्रशासनाची आहे. त्यामुळे शासन आणि ग्रामस्थ दोघांचीही दिशाभूल होते.

या प्रकारांबाबत सामाजिक कार्यकर्ते तसेच मुख्य प्रचार प्रमुख, माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ. गणेश ढवळे यांनी पालकमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे लक्ष वेधून, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

रस्ता सुरू असतानाच कामाची गुणवत्ता तपासा - डॉ. गणेश ढवळे

ग्रामस्थांनी ग्रामीण रस्त्यांच्या विकासासाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या कामावर लक्ष ठेवणे अत्यावश्यक आहे. या योजनेचा उद्देश दुर्गम वाड्या-वस्त्यांना जोडणे आणि विद्यमान रस्त्यांची दर्जोन्नती करणे हा आहे.रस्ते नसल्याने अनेक गावांतील विद्यार्थी, विशेषतः मुली, शिक्षणापासून वंचित राहतात. म्हणून रस्त्याचे काम सुरू असतानाच अंदाज पत्रकाप्रमाणे आणि दर्जेदार काम होणे याची खात्री करून घ्यावी, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

# शेवगाव शहरात भटक्या कुत्र्यांचा उच्छाद; नागरिक भयभीत, प्रशासनाकडून दुर्लक्ष

## सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे नगरपरिषदेकडून उल्लंघन

अहिल्यानगर/प्रशांत बाफना

शेवगाव शहरामध्ये भटक्या कुत्र्यांचा उच्छाद दिवसेंदिवस वाढत असून नागरिक, शाळकरी मुले तसेच ज्येष्ठ नागरिक या सर्वच वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील मुख्य रस्ते, बाजारपेठा, शाळांच्या परिसरात तसेच वसाहतींमध्ये भटक्या कुत्र्यांचे थवे दिसत असून रात्रीच्या वेळी बाहेर पडणे अनेकांना धोक्याचे ठरत आहे. त्यामुळे शेवगाव



नगरपरिषद ही सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करत असल्याचे दिसत आहे..

गेल्या काही दिवसांत शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांच्या चावण्याच्या काही घटना घडल्याचे समजते. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरवासीयांकडून केली जात आहे.

शाळकरी मुले शाळेत ये-जा करताना कुत्र्यांच्या भीतीने घाबरलेली दिसतात. काही ठिकाणी ज्येष्ठ नागरिक व महिला सकाळच्या किंवा संध्याकाळच्या वेळच्या फिरण्यास जाण्यास टाळाटाळ करत आहेत. रस्त्यावरच कुत्र्यांचे साम्राज्य असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत आहे.

नगरपरिषदेच्या दुर्लक्षामुळे हा प्रश्न अधिक तीव्र झाला असल्याची नागरिकांची भावना आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या गजरात शहरातील कुत्र्यांचे नियंत्रण मात्र प्रशासनाच्या आवाक्याबाहेर गेले आहे. संबंधित विभागाकडून निर्बंध, बंध्याकरण मोहिम किंवा निवारा केंद्राबाबत कोणतीही ठोस कारवाई दिसून येत नाही.

**सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे शेवगाव नगर परिषदेकडून उल्लंघन...**
सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांवर तत्काळ प्रतिबंध घालण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार तात्काळ कुत्र्यांची नसबंदी व लसीकरण करणे गरजेचे आहे.. परंतु असे कुठेही शहरामध्ये होताना दिसत नाही.

भटक्या श्वान तसेच जनावरांच्या संदर्भात आपण तीन वेळा नगरपरिषदेकडून टेंडर केले होते. परंतु ठेकेदारांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्यामुळे यावर उपाययोजना होऊ शकल्या नाहीत, तसेच यावर काम चालू आहे अशी त्यांनी म्हटले, परंतु याबाबत त्यांना वरिष्ठांकडून मार्गदर्शन मागितले का ? यावर विचारले असता ? त्यांनी मुख्याधिकारी मॅडम यांना विचारा असे सांगितले.

## एक बेवारस गाईची व्यथा आपण सगळ्यांनी ऐकली पाहिजे - आकाश गायके



शिरूर कासार प्रशांत बाफना

शिरूर कासार शहरात बुधवार रोजी एक बेवारस गाय गंभीर जखमी अवस्थेत होती. तिच्या पायाला खोल जखम झाली असून रक्त सतत वाहत होतं.हे दृश्य पाहून मन हेलावून गेलं.तिचे सध्या तरी उपचार केलेले आहेत, पण तिची स्थिती अजूनही चिंताजनक असल्याचे आकाश गायके या तरुणाने सांगितले आहे.

हा तरुण युवक गेली दोन दिवस झाले विनंती करत असून देखील ही गाय ज्या कोणाची असेल तर त्या मालकांनी पुढे येऊन तिची जबाबदारी घ्यावी असे आवाहन करत असून देखील येथील असलेले या गो मातेचे मालक याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आकाश गायके यांनी सांगितले आहे. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व प्रशासनाने देखील या गंभीर विषयाकडे तातडीने लक्ष द्यावे. व या निरागस जीवाचे होणारे हाल थांबवावे अशी भावना अनावर केली.

तसेच एखादी गाय जर जखमी अवस्थेत असेल त्यावेळी लोक हे मला फोन करतात मात्र पशु वैद्यकीय डॉक्टरांना फोन करत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.त्यामूळे आपण सर्व नागरिकांनी मिळून अशा जखमी,बेवारस प्राण्यांसाठी थोडी संवेदना,थोडं प्रेम आणि काळजी दाखवावी हीच खरी मानवतेची ओळख आहे. असे आकाश गायके यांनी बोलताना सांगितले

# कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरीने काढला लॉंगमार्च

## सामाजिक संस्थांसह महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग

अंबाजोगाई / प्रतिनिधी

समाजात कॅन्सर या रोगाविषयी जागरूकता निर्माण होण्यासाठी उपचारानंतर हा आजार पुर्णतः बरा होतो. हा संदेश देत रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीने कॅन्सर जनजागृतीसाठी शहरात लॉंगमार्च काढून आरोग्य जनजागृतीचा संदेश दिला.

रोटरी क्लबच्या वतीने रोटरी रन कॅन्सर जनजागृती हा उपक्रम राबविण्यात आला. कॅन्सर या आजाराची जनजागृती करण्यासाठी शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलिस स्टेशन या अंतरात शहरवासीयांचा लॉंगमार्च काढण्यात आला. या लॉंगमार्चचे उद्घाटन लातूर येथील प्रसिद्ध कॅन्सर रोग तज्ञ डॉ.अजय पुनपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी पोलिस निरिक्षक शरद जोगदंड, रोटरी क्लबच्या अध्यक्षा रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सहसचिव राधेशाम लोहिया, डॉ.नवनाथ घुगे, संतोष मोहिते, कल्याण काळे विजयसिंह ठाकुर, हर्षवर्धन वडमारे, राजेंद्र घोडके, भारतीय जैन संघटनेचे आदेश कर्नावट यांच्या उपस्थितीत या लॉंगमार्चचा प्रारंभ झाला. कॅन्सर जनजागृतीचे विविध फलक हातात घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शहरातून ही रॅली काढली. रॅलीचा समारोप पोलिस स्टेशन येथे झाला. यावेळी अनेकांनी कॅन्सर जनजागृतीसाठी रोटरी क्लबला आर्थिक मदत केली. रोटरी क्लबच्या वतीने कॅन्सर रूग्णांची पुर्व तपासणी करण्यासाठी रोटरी क्लब मोबाईल व्हॅन उभी करणार आहे. यासाठी हा मदत निधी जमा करण्यात येत असल्याचे रोटरी क्बलच्या अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी सांगितले. यावेळी कॅन्सर या



आजारातून मुक्त झालेल्या रूग्णांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी त्यांच्या अनुभवाचे कथनातून जनजागृती केली. यावेळी रोटरी क्बलचे सदस्य, भारतीय जैन संघटना, स्व.प्रमोदजी महाजन नर्सिंग कॉलेज, कै.बाबुराव घुले नर्सिंग कॉलेज, गंगा नर्सिंग कॉलेज, राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी योगा सोहम योगा क्लास काळवटी मुडमॉर्निंग ग्रुप यांच्यासह शहरातील सामाजिक संस्था या उपक्रमात सहभागी झाल्या.

कॅन्सर उपचारानंतर बरा होतो- डॉ.अजय पुनपाळे

कॅन्सर हा आजार उपचारानंतर पुर्ण पणे बरा होतो. यासाठी शरिरात होणार्या बदलांवर लक्ष ठेवा. या आजाराची लागन होत असल्याबद्दल प्राथमिक लक्षणे आढळुन येताच उपचार घ्या. यातून कॅन्सर पुर्णपणे बरा होतो. असे प्रतिपादन कॅन्सर तज्ञ डॉ.अजय पुनपाळे यांनी केले. यावेळी त्यांनी उपस्थितांना कॅन्सरच्या आजारासंदर्भातील संपुर्ण माहिती उपचार पद्धती घ्यावयाची काळजी

## सर सय्यद अहमद खान उर्दू प्राथमिक व पिपल्स माध्यमिक शाळेत मौलाना अबुल कलाम आझाद शिक्षण दिन साजरा





बीड /प्रतिनिधी

सर सय्यद अहमद खान व पिपल्स माध्यमिक शाळा , बीड येथे ११ नोव्हेंबर रोजी मौलाना अबुल कलाम आझाद शिक्षणदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेच्या वतीने भव्य शैक्षणिक रॅलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी हातात विविध संदेशफलक घेऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देणारे घोषवाक्ये दिली.


कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आपली लेखनकला सादर केली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आपली लेखनकला सादर केली.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि भारताचे पहिले शिक्षणमंत्री मौलाना अबुल कलाम आझाद यांचे देशाच्या शैक्षणिक विकासातील योगदान याबद्दल माहिती देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षकांनी केले तर शाळेचे मुख्याध्यापक यांनी आभार प्रदर्शन केले.

## घोरदरी येथील जलजीवन मिशनच्या कामासाठी ३१ डिसेंबरची डेडलाईन; विलंब झाल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा

सेनगाव / प्रतिनिधी

तालुक्यातील घोरदरी येथील जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेले जलपुरवठा योजनेचे काम निर्धारित मुदतीत पूर्ण न झाल्याने प्रशासनाने गंभीर भूमिका घेतली आहे. ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागाचे उपविभागीय अभियंता यांनी संबंधित कंत्राटदार चंद्रकांत कांदे यांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे लेखी आदेश दिले असून, विलंब झाल्यास दंडात्मक कारवाईचा इशारा दिला



आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून घोरदरी येथील जलजीवन मिशनचे काम रखडल्याने गावातील नागरिकांना पाण्यासाठी दररोज भटकंती करावी लागत आहे. या समस्येबाबत ग्रामस्थ कैलास जाधव, भगवान फुफाटे व इतरांनी जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली होती. तक्रारीची दखल घेत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पाणीपुरवठा विभागास तात्काळ काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. त्यानंतर उपविभागीय अभियंता यांनी घोरदरी गावाला भेट देत कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान कंत्राटदाराने काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते.मात्र प्रगती समाधानकारक नसल्याने नोटीस बजावण्यात आली.

## जळकोट जि.प. गटातून शिवसेनेकडून आश्विनी प्रशांत नवगिरे यांच्या नावाची जोरदार चर्चा

तुळजापूर/प्रतिनिधी

जळकोट:- जळकोट जिल्हा परिषद गटात आगामी निवडणुकीची तयारी वेग घेत आहे. या गटातून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाकडून आश्विनी प्रशांत नवगिरे यांनी आपली इच्छुकता जाहीर केली असून, स्थानिक राजकारणात त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. आश्विनी नवगिरे यांच्या पाठीशी जळकोट नगरीचे उपसरपंच प्रशांत नवगिरे यांचे ठाम आणि अनुभवी नेतृत्व आहे. प्रशांत नवगिरे यांनी विकासकामांना प्राधान्य देत लोकसेवेत विश्वासाचे स्थान निर्माण केले आहे. सर्वसामान्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांनी अनेक धडाकेबाज आंदोलने उभारून समाजातील वंचित व उपेक्षितांना न्याय देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. त्यांच्या कार्यपद्धतीमुळे आणि जनसंपर्कामुळे जळकोट परिसरात नवगिरे दाम्पत्याची जोडी लोकप्रिय ठरली आहे.

ठाकरे गटाकडून जळकोट जि.प. गटात आश्विनी नवगिरे यांच्या इच्छुकतेनंतर स्थानिक शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. महिला नेतृत्वातून नवा बदल घडविण्याचा त्यांचा प्रयत्न असून, ग्रामविकासाच्या दिशा आणि वेगाला नवा आयाम देण्याचा त्यांचा निर्धार आहे.

जळकोट जि.प.गट नेहमीच चुरशीच्या निवडणुकीसाठी ओळखला जातो. यंदाच्या निवडणुकीत महिला आरक्षण असल्याने



आश्विनी नवगिरे यांची इच्छुकता अधिक महत्त्वाची ठरत आहे. स्थानिक नागरिकांमध्ये त्यांच्या नावाबाबत उत्सुकता वाढली असून, त्यांचे पती जळकोटचे उपसरपंच प्रशांत नवगिरे यांच्या समाजकार्यातील सक्रियता आणि प्रामाणिक कार्यपद्धतीमुळे त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. स्थानिक जनतेच्या अपेक्षा, शिवसेना पक्षाचे संघटन, आणि नवगिरे दाम्पत्याची लोकसेवेतील निष्ठा यामुळे ही निवडणूक अधिक रंगतदार ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# शिर्डी येथील साई जीवन गौरव पुरस्कार सोहळ्यासाठी विविध समित्यांची घोषणा

## पुरस्कार सोहळ्यासाठी महाराष्ट्रातून नामवंत मान्यवरांची उपस्थिती लाभणार

निफाड /प्रतिनिधी

ओम साई विकास प्रतिष्ठान व बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथील पवित्र साईबाबांच्या पुण्य पावन नगरीमध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती संस्था व मान्यवरांचा साई जीवन गौरव पुरस्काराने सन्मान होत असून हा पुरस्कार सोहळा शिर्डी नगरीमध्ये १० जानेवारी २०२६ रोजी अध्यात्मिक व सांस्कृतिक वातावरणात संपन्न होणार आहे.

पुरस्कार वितरण सोहळा आकर्षक व सूत्रबद्ध पद्धतीने झाला पाहिजे याकरिता शिर्डी येथील साई भक्त निवास ५०० रुम च्या पाठीमागील बाजूस असलेल्या हॉटेल साई सुमन येथे नुकतीच साई जीवन पुरस्कार सोहळा समितीच्या बैठक घेण्यात आली.यावेळी साई जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळा आयोजन समिती संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे सर यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील नामवंत मातब्बर मंडळींच्या उपस्थितीत साई जीवन गौरव पुरस्कार वितरण सोहळा संदर्भात विचार विनय होऊन चर्चा झाली असता शिर्डी भव्य दिव्य पुरस्कार सोहळा ओम साई विकास प्रतिष्ठान, बीबीसी फिल्म प्रोडक्शन महाराष्ट्र राज्य निर्मित साई जीवन गौरव पुरस्कार



२०२६ सोहळा अतिशय धुमधडाक्यात व फटाक्याच्या आतष बाजीत परिवार लॉन्स येथे संपन्न होणार आहे .

या पुरस्कार सोहळ्यासाठी डॉक्टर, पत्रकार, सामाजिक ,धार्मिक, समाजसेवक ,नामवंत उद्योजक, हलगी वाजवणारे, वाजंत्री वादक, मेहंदी, रांगोळी स्पर्धा अनेक अशा ३६ विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व विविध नटलेल्या पारंपारिक मान्यवरांना राज्यस्तरीय साई जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. महाराष्ट्रभरातील नामवंत फिल्मी कलाकार ,दिग्दर्शक , निर्माते ,अभिनेते ,अभिनेत्री आदींच्या शुभहस्ते पुरस्कार सोहळा संपन्न होत आहे. आयोजित कमिटी स्वागत कक्ष समितीमध्ये सौ विद्या ठाकूर मुंबई, अभिनेत्री सौ आरती बारवसे, सुप्रसिद्ध समाजसेविका तथा अभिनेत्री सौ राजनंदिनी अहिरे नाशिक,समाज सेविका सौ पायल राजगुरू , सामाजिक कार्यकर्ते सौ योगिता डांगळे, सामाजिक कार्यकर्ते सौ रंजना बलसाने ,स्टेजवरील व्यवस्था सौ सविता वडनेरकर, सौ रंजना बलसाने, सौ विद्या ठाकूर,सौ पायल राजगुरू, सौ आरती बारवसे, आदर्श शिक्षिका श्रीमती प्रीती म्हसदे, भोजन व्यवस्था समिती शिवसेना मदत केंद्र वाशिम जिल्हा अध्यक्ष डॉ.माधवराव वानखेडे, समाजसेवक श्री संभाजी खैरे, समाजसेवक श्री समाधान बिथरे ,वारकरी मंच प्रदेश प्रसिद्धीप्रमुख तथा वरीष्ठ पत्रकार रामभाऊ आवारे सर निफाड, माय माऊली शिवशक्ती फाउंडेशन राष्ट्रीय कार्याध्यक्ष श्री डॉ.शाम जाधव नाशिक, सजावट कमिटी सौ मंगला वीरशिद, समाजसेवक शंकरराव कन्हेरकर, सामाजिक कार्यकर्ते श्री सागर बैरागी निफाड ,सौ. मीनाक्षी अहिरे, श्री समाधान बिथरे, वरिष्ठ पत्रकार रामभाऊ आवारे सर, जेष्ठ पत्रकार श्री डॉ. शाम जाधव यांनी असे आवाहन केले आहे की, आलेल्या सर्व पुरस्कारांचे स्वागत करीत असून हा कार्यक्रम नियोजनबद्ध होण्यासाठी आयोजक समिती व मार्गदर्शन करतील. पुरस्कार सोहळ्या विषयी अधिक माहिती व पुरस्कार सोहळा स्थळाविषयी माहितीसाठी खालील आयोजक समितीच्या सदस्यांची संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे,डॉक्टर शाम जाधव मो. ७२४८९९३५९९ नाशिक,शंकरराव कन्हेरकर मो. ९९२१९१८८९७ नेवासा, पत्रकार रामभाऊ आवारे सर मो. ८७८८५०४५१२ निफाड, समाधान बिथरे मो. ९७६३१०१०२५,सागर बैरागी निफाड या नंबरवर संपर्क साधावा असे पुरस्कार सोहळा आयोजन समितीने आव्हान केले आहे .

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची अस्पृश्यता संपविण्यासाठी वरिष्ठ पातळीवर चर्चा करणार - आनंद सरपते

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनुषंगाने संवाद जिल्हा पदाधिकारी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागची बैठक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी जिल्हा कार्यालय बीड येथे संपन्न झाली.या बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांना सन्मानाची वागणूक मिळत नाही असा सूर व्यक्त करण्यात आला यावर दादांशी चर्चा करून पदाधिकाऱ्यांना सन्मान मिळेल असा प्रयत्न करेल असा शब्द आनंद सरपते यांनी पदाधिकाऱ्यांना दिला.

राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग पदाधिकारी यांची महत्वपूर्ण बैठक पक्ष कार्यालयात संपन्न झाली या बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांनी काही




सूचना केल्या. यामध्ये पक्ष खालच्या पातळीवरती सामाजिक न्याय विभागाच्या पदाधिकाऱ्याला सन्मानाची वागणूक देत नाही. निवडणुकी संदर्भात पदाधिकाऱ्याला विचारात घेतल्या जात नाही. असा एकच सूर सर्वांचा होता. राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष आनंद सरपते यांनी आपलं मत व्यक्त करताना सांगितले की, शिव फुले शाहू बाबासाहेब अण्णाभाऊंच्या विचारावरती राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी काम करीत आहे. ज्या पण आपल्या अडचणी असतील आणि पक्षामध्ये आपण जर अस्पृश्य समजले जात असतोल. तर वरिष्ठ पातळीवरती सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष सुनीलजी मगरे साहेब यांच्यासोबत चर्चा करून वरिष्ठ पातळीवर बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अस्पृश्य वागणूक देत असेल तर सामाजिक न्याय विभागाची त्यावरती चर्चा करून निर्णय घेऊ असे आनंद सरपते यांनी आपल्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना सुचविले आहे. होऊ घातलेल्या नगरपरिषद जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची ताकद आपल्या माध्यमातून भक्कम करून अजित दादा यांच्या वरती विश्वास ठेवून सर्वांनी एकत्रित काम करणे गरजेचे आहे अशा सूचना दिल्या.



सावळदबारा /प्रतिनिधी

दि १२ नोव्हेंबर रोजी फर्दापूर गटातील सावळदबारा पंचायत समिती गण मधील गाव सावळदबारा, नांदातांडा,मोलखेडा, टिटवी, पळसखेडा,रवळा, जवळा, पिपळा, जामठी, डाभा, देव्हारी, मूर्ती, महालब्धा, हिवरी, पिपळवाडी आदी गावाना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यानी गावाना भेटी दिल्या आहेत.

# राष्ट्रीय शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेत बीडच्या ओंकार परदेशीने जिंकले कांस्यपदक




बीड /प्रतिनिधी

जम्मू काश्मीर येथे सुरू असलेल्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय तायक्कांदो क्रीडा स्पर्धेसाठी चॅम्पियन्स अकॅडमी बीड चा राष्ट्रीय खेळाडू ओंकार राजू परदेशी याने महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करताना ७३ किलो वजनगटात कांस्यपदक पटकावले आहे, अशी माहिती तायक्कांदो असोशिएशन फ महाराष्ट्र , मुंबई संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे यांनी दिली आहे.

केंद्र सरकारच्या स्कूल गेम फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित ६९ वी राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धा २०२५ जम्मू काश्मीर येथे ९ ते १३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान सुरू आहे. १९ वर्षे वयोगटातील या राष्ट्रीय शालेय तायक्कांदो स्पर्धेसाठी ओंकार राजू परदेशी हा दुसऱ्यांदा महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत आहे. त्याने ७३ किलो वजनगटात चमकदार कामगिरी करून राष्ट्रीय कांस्यपदक पटकावले आहे. हा खेळाडू बीड जिल्हा क्रीडा संकुलातील डॉ. अविनाश बारगजे यांच्या चॅम्पियन्स तायक्कांदो अकॅडमीचा खेळाडू आहे.

या खेळाडूला जिल्हा संघटनेचे मार्गदर्शक डॉ योगेश क्षीरसागर, डॉ सारिकाताई क्षीरसागर, जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर सर , जिल्हा संघटनेचे अध्यक्ष श्री. नितीनचंद्र कोटेचा, श्री.दिनकर चौरे, डॉ अविनाश बारगजे , जया बारगजे , श्री. बन्सी राऊत, श्री. भरत पांचाळ, श्री.सुनिल राऊत , डॉ. विनोदचंद्र पवार, श्री.मनेश बनकर, श्री.प्रसाद साहू , श्री.बालाजी कराड यांच्यासह जिल्हा संघटनेच्या सर्व वरिष्ठ खेळाडू ,सर्व पदाधिकाऱ्यांनी ओंकार याचे अभिनंदन केले आहे.

# काळवीट कुत्र्यांच्या हल्ल्यात ठार, वनविभागाच्या अधिकाऱ्यांना फोन घ्यायला वेळ नाही – डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश /प्रतिनिधी

बीड तालुक्यातील मांजरसुंभा ते पाटोदा राष्ट्रीय महामार्गावरील महाजनवाडी शिवारातील वनपरिसरात आज बुधवार (दि.१२) सकाळी सुमारास काळवीट मृतावस्थेत आढळून आले.

काळवीटाच्या शरीरावर इतरत्र कुठेही गंभीर जखमा नसल्याचे दिसून आले. मात्र पोटाचा भाग छिन्नविछिन्न अवस्थेत असल्याने भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात काळवीट ठार झाले असावे, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेने परिसरातील ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे.या घटनेच्या वेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे प्रशांत क्षीरसागर, तसेच महाजनवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच विश्वंभर गिरी, विशाल घरत, संदिप घरत, ऋषिकेश घरत, शंकर घरत, सतिश घरत



आणि इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांना फोन उचलायला वेळ नाही – डॉ. गणेश ढवळे

डॉ. ढवळे यांनी सांगितले की, पूर्वीचे वनपरिक्षेत्र अधिकारी अशोक काकडे हे अशा घटनांवर तत्काळ प्रतिसाद देत आणि कर्मचाऱ्यांना घटनास्थळी पाठवत. परंतु सध्याचे अधिकारी सांगुळे यांनी फोन न उचलल्याने तातडीने कार्यवाही होऊ शकली नाही, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. यानंतर बदली होऊन गेलेले वनपाल बहिरवाळ यांच्याशी संपर्क साधल्यावर त्यांनी नव्या वनपाल विजय केदार यांचा मोबाईल क्रमांक दिला. त्यावरून डॉ. ढवळे यांनी त्यांना घटनेची माहिती देत वनविभागाने तत्काळ चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी केली. वनकर्मचारी येई पर्यंत कुत्र्यांनी काळवीटाचे लचके तोडु नये म्हणून लिंबाच्या झाडाच्या पानांनी झाकुन ठेवले.

# ॲड. बापूसाहेब जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेना जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती!

बीड /प्रतिनिधी

वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या आशीर्वादाने, तसेच महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री व शिवसेना मुख्यनेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार, शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्या सूचनेवरून आणि माध्यमातून ॲड. श्री. बापूसाहेब विठ्ठलराव जाधव यांची शिवसेना प्रणित शेतकरी सेनेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. काल, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी शिवसेना मध्यवर्ती कार्यालय, बीड येथे नगर पालिका इच्छुक उमेदवारांच्या मुलाखत सत्र कार्यक्रमात जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी ॲड. जाधव यांना नियुक्तीपत्र प्रदान करून त्यांचा सत्कार केला. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत



बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

ॲड. बापूसाहेब जाधव हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक आणि जनसंपर्क कार्यात सक्रिय असून त्यांनी समाजसेवक म्हणून स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. पुढे ते शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेबांची शिकवण यांचा प्रचार-प्रसार करत, शिवसेना पक्षाच्या बळकटीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम करतील, असा विश्वास जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी व्यक्त केला. उपस्थिती शिवसेना पदाधिकारी तथा शिवसैनिकांनी ॲड. बापूसाहेब जाधव यांचे अभिनंदन करत शिवसेना पक्षात स्वागत केले.

# बीड पोलीस दलाकडून जिल्हाभरात विशेष मोहीम, लाखोंचा दंड वसूल !





बीड /प्रतिनिधी

दिनांक १२/११/२०२५ रोजी पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत यांचे संकल्पनेतून व जिल्हा वाहतुक शाखा बीड यांचे समन्वयातून बेशिस्त वाहन चालकांवर नियंत्रण व वाहतूक नियमन करण्यासाठी बीड जिल्ह्यातील पाडळशिंगी टोलनाका, बार्शी नाका बीड, साठे चौक वडवणी, केज टोल नाका, चुंभळी फाटा पाटोदा, गोमाळवाडा फाटा शिरूर, धारुर टोल नाका, बर्दापूर टोल नाका, परभणी टी पॉईंट माजलगाव, ईटके कॉर्नर परळी, आंभोरा चेक पोस्ट अशा विविध ठिकाणी विशेष नाकाबंदी करून मोहीम राबविण्यात आली होती.

सदर कारवाई दरम्यान १३४० वाहन धारकांवर करण्यात आली असून मागील प्रलंबित दंडासह एकूण ११,०८,९५०/- चा दंड वसूल करण्यात आला आहे.सदरील कारवाई पोलीस अधीक्षक श्री.नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनात जिल्ह्यातील वाहतुक शाखेचे अधिकारी पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.

# अंभोरा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैध वाळू साठ्यावर पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## तब्बल ५० लाखापेक्षा अधिक वाळूसह मुद्देमाल जप्त !

बीड /प्रतिनिधी

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीतील परिसरात पोलिसांनी अवैध वाळू माफियांवर धाडसी कारवाई केली. आरोपी दिपक बाळु कर्डिले, रा. कडा, ता. आष्टी, जि. बीड सह इतर ३ अनोळखी इसम यांच्या ताब्यातून एक जेसीबी, दोन ट्रॅक्टर, दोन ट्रॉली (वाळू भरलेले), वाळू धुण्यासाठीचे इंजिन, पाईप व लोखंडी चाळणी असे साहित्य एकूण किंमत ५०,४५,०००/- (पन्नास लाख पंचेचाळीस हजार रुपये) जप्त करत धाडसी कारवाई केली आहे.

अंभोरा पोलीस ठाणे हद्दीमध्ये



दिनांक १०/११/२०२५ रोजी अवैध्य वाळू उपसा चालू असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून कारवाई केली असता, घटनास्थळी एक जेसीबी, दोन ट्रॅक्टर, दोन ट्रॉली वाळू भरलेले, वाळू धुण्यासाठी असलेले इंजिन, पाईप व लोखंडी चाळणी असे साहित्य आढळून आले.पोलिसांना पाहताच आरोपी वाहने जागेवर सोडून घटनास्थळावरून पळून गेले. सदर मुद्देमालाचा पंचनामा करून एकूण ५०,४५,०००/- किंमतीचा माल ताब्यात घेण्यात आला असून गु.र.नं. ३७२/२०२५, कलम इछड ३०३(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार क्र.१३१८ गिरी हे करीत आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. बाळकृष्ण हानपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश साळवे व त्यांच्या अंमलदार पथकाने केली आहे.

# कवडगाव पंचायत समिती गणातून सोळंके घराण्याशी एकनिष्ठ असणारे महादेवराव आंबुरे यांना उमेदवारी द्यावी

वडवणी /प्रतिनिधी

वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती तथा खळवट लिमगावचे माजी सरपंच तसेच माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांचे गेल्या वीस वर्षापासून एकनिष्ठ एक भक्त असणारे महादेवराव अंबुरे पाटील यांना कवडगाव पंचायत समिती गणातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने उमेदवारी देण्याची मागणी जनतेतून होत आहे.

वडवणी तालुक्यातील खळवट लिमगावचे रहिवासी असणारे महादेवराव आंबुरे हे गेल्या वीस वर्षापासून राजकारण आणि समाजकारणात सदैव अग्रेसर असतात ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष गावागावात पोहोचवण्यासाठी तळागाळात जाऊन काम केलेले असून ते माजलगाव मतदार संघातील राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश दादा सोळंके व युवा नेते जयसिंग भैया सोळंके यांचे निष्ठावंत,एकनिष्ठ एक भक्त कार्यकर्ते असून दादा व भैया हाच पक्ष समजून ते गेल्या अनेक वर्षापासून राजकारण व समाजकारणात काम करतात दादांच्या आशीर्वादाने ते वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राहिलेले असून या काळात त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देण्याचे काम केलेले असून तसेच खळवट लिमगाव ग्रामपंचायतचे सरपंच पद हे त्यांनी भुषवलेले असून या माध्यमातून त्यांनी गावामध्ये सर्व समाजाच्या लोकांना न्याय देण्याचे काम केलेले असून त्यांच्या अडीअडचणी सोडवण्याचे काम केलेले आहे तसेच पदाच्या माध्यमातून त्यांनी गावांमध्ये सभामंडपाचे काम असतील, रस्त्याचे कामे, शौचालय बाधकामे, घरकुल कामे असतील यासह विविध विकास कामे राबविलेले आहेत तसेच वडवणी तालुक्यात त्यांचा दांडगा जनसंपर्क असून उपळी जिल्हा परिषद गटातील कवडगाव पंचायत समिती गण हा सर्वसाधारण ओपन साठी सुटलेला आहे तरी या गणातून अजित पवार गट राष्ट्रवादी



काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रबळ दावेदार हे महादेव अबुरे समजले जातात तरी आमदार सोळंके व युवा नेते जयसिग सोळके यांनी कवडगाव पंचायत समिती गणातुन महादेव आंबुरे पाटील यांनाच उमेदवारी देण्याची मागणी जनतेतून व मतदारांमधून होत आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ शाळेत विद्यार्थी दिवस उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधी

दि.७ नोव्हेंबर २०२५ शुक्रवार रोजी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करुन पुजन करून विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे शिक्षण व पुस्तकावर जिवापाड प्रेम करणारे होते.त्यांचा शाळेतील पहिला प्रवेश दिन.त्यांनी प्रताप सिंग हायस्कुल सातारा या शाळेत दि.७ नोव्हेंबर रोजी प्रवेश घेतला होता. दि.७ नोव्हेंबर हा विद्यार्थी दिवस म्हणून ओळखला जाऊ लागला.अशी माहिती आपल्या प्रास्ताविकात जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा कुंबेफळ केंद्र केज मुलांची ता.केज याशाळेचे अपग्रेड मुख्याध्यापक श्री. राजाभाऊ दत्तात्रय कदम यांनी सांगितले.या शाळेतील पदवीधरशिक्षक डॉ.रामकिशन मुळे सर, संदीप ठोंबरे सर यांनी सखोल माहिती देऊन मार्गदर्शन केले.शिक्षक सर्वश्री आकाश लोंढे, राहुल बचुटे,धपाटे आबासाहेब,शिक्षिका श्रीमती भोरे निलावती मॅडम,श्रीमती उटीकर अंजली,ट्रेनी शिक्षिका काळे रोहिणी यांनी सविस्तर माहिती दिली.या कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षिका,पी एम पोषण शक्ती निर्माण योजना कामगार श्रीमती सुवर्णमाला पवार, विद्यार्थी,विद्यार्थीनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन इ.७ वी वर्गा तील विद्यार्थीनी सिध्दी विजय थोरात हिने केले. शेवटी शिक्षक राहुल बचुटे सर यांनी आभार मानले.

युसूफ वडगाव जिल्हा परिषद गट जिंकण्यासाठी राहुल भैय्या सोनवणे यांचे मिशन! बीड जिल्ह्याच्या राजकारणात

# ‘राहुलभैय्या’ पर्व - काँग्रेस जिल्हाध्यक्षांची दमदार तयारी

केज/प्रतिनिधी

बीड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे यांनी आगामी युसूफ वडगाव जिल्हा परिषद गटाच्या निवडणुकीवर आपले पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे. लढणार आणि जिंकणार! या निर्धाराने त्यांनी निवडणुकीची रणनीती आखत गावा गावात जनसंपर्क मोहीम सुरू केली आहे.

युसूफ वडगाव सर्कल मधील प्रत्येक गावाशी त्यांचा घट्ट संपर्क असून, शेतकरी,कामगार,महिला आणि युवक वर्गात त्यांचा प्रभाव लक्षणीय आहे.गंगा माऊली शुगर कारखाना, विविध शैक्षणिक संस्था आणि शेतकरी क्रांती आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागात आपली ठसठशीत ओळख निर्माण केली आहे.

शेतकरी हितासाठी अखंड लढा:

राहुल भैय्या सोनवणे यांनी शेतकरी क्रांती आंदोलन आणि गंगा माऊली साखर कारखान्याच्या माध्यमा तून शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत.त्यांच्या कार्यामुळे शेतकऱ्यांचा त्यांच्यावर विश्वास वाढला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील योगदान:

त्यांच्या शिक्षण संस्थांमुळे अनेक गरीब आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. शिक्षणाच्या माध्यमातून समाज उन्नती करण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

सारणी-आनंदगाव मॉडेल:

सारणी आणि आनंदगाव ग्रामपंचायतींमध्ये शाश्वत विकासाचे मॉडेल उभे करून त्यांनी ग्रामीण प्रशासनात पारदर्शक आणि प्रगत दृष्टिकोन दाखविला आहे.सारणी ग्रामपंचायतचा कारभार समर्थपणे राहुल भैय्या सोनवणे यांच्या नेतृत्वात वाटचाल करीत आहे.

सर्वसमावेशक नेतृत्व:

राहुल भैय्या हे सर्व जाती धर्मातील नागरिकांना सोबत घेऊन जाणारे सर्वसमावेशक नेते म्हणून ओळखले जातात.त्यांच्या नेतृत्वामुळे काँग्रेस पक्षाचे संघटन ग्रामीण भागात अधिक मजबूत झाले आहे.

मराठा आरक्षणासाठी आंदोलन:

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी त्यांनी केवळ भाषणांपुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन केले.या संघर्षमय भूमिके मुळे समाजात त्यांच्या नेतृत्वावरचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.

युसूफ वडगाव जिल्हा परिषद गट काँग्रेसच्या ताब्यात आणून जिल्ह्यात पक्षाला अधिक बळकट करण्याचे मोठे



मिशन राहुल भैय्या सोनवणे यांनी हाती घेतले आहे. त्यांच्या या आक्रमक तयारीमुळे युसूफ वडगाव गटाची निवडणूक लढत अधिक रोचक होणार आहे,यात शंका नाही.

# पात्र असूनही शेतकऱ्यांना अनुदान मिळेना

## रमेश आडसकरांनी तहसील प्रशासनाला विचारला जाब

धारूर । प्रतिनिधी

यावर्षीच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड नुकसान झाले होते. शेतकऱ्यांचे हातचे पिक वाहून गेले, बागायती तसेच कोरडवाहू शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. या नुकसानीची भरपाई म्हणून शासनाकडून दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांना अनुदान मंजूर करण्यात आले होते. मात्र या अनुदानाचे वितरण अत्यंत संथगतीने होत असून, पात्र असूनही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यात अद्याप रक्कम जमा झालेली नाही. शेतकऱ्यांच्या हक्काच्या या मदतीसाठी शासनाने मंजुरी दिल्यानंतरही महिना उलटून गेला तरी अर्ध्याहून अधिक शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित राहिले आहेत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या तक्रारीची दखल घेत नसल्याने तहसील प्रशासनाला सर्वाधीचे नेते रमेश आडसकर यांनी जाब विचारत पुढील चार दिवसात शेतकऱ्यांच्या अनुदानाच्या समस्या सुटल्या पाहिजे अशी मागणी केली.

या सर्व प्रकारात गाव स्तरावरील तलाठी, मंडळ अधिकारी तसेच तहसील प्रशासनाकडून झालेल्या चुकांमुळे शेतकऱ्यांना न्याय मिळण्यात अडथळे येत असल्याचे स्पष्ट होत आहे. अनेक शेतकऱ्यांचे फार्मर आयडी प्रणालीमध्ये अस्तित्वात असतानाही त्यांना मदत मिळत नाही, तर काही ठिकाणी केवायसी यादी गावात पोहोचल्यावरही ती प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. अनेक शेतकऱ्यांनी वारंवार तहसील कार्यालयात येऊन प्रशासनाचे लक्ष वेधले तरी त्यांना उडवा-उडवीची उत्तरे दिली जात असल्याची तक्रार



शेतकऱ्यांनी केली. या सर्व गैरप्रकाराची माहिती मिळाल्यानंतर कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी नेहमीच पुढाकार घेणारे राष्ट्रवादीचे नेते रमेश आडसकर यांनी या विषयात स्वतः पुढाकार घेत तहसील कार्यालयात हजेरी लावली.बुधवारी धारूर तहसील कार्यालयात रमेश आडसकर यांनी स्वतः हजर राहून संबंधित कर्मचाऱ्यांना अनुदान वितरणात होणाऱ्या विलंबाबद्दल जाब विचारला. पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे अनुदान मिळण्यात नेमके कोणते अडथळे येत आहेत याची सविस्तर चौकशी करत माहिती घेण्यात आली. त्यांनी प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या की पुढील तीन ते चार दिवसांत तालुक्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा झाली पाहिजे, शेतकऱ्यांच्या हक्काच्या मदतीसाठी आम्ही शांत बसणार नाही, असे ठाम सांगत तहसील प्रशासनाने अडचणीतील शेतकऱ्यांच्या अडचणी गतीने सोडवाव्यात अशी मागणी केली.

या वेळी कोळपिंपरी ग्रा.पं. चे उपसरपंच तुषार खुळे, पांगरी सेवा सहकारी सोसायटीचे व्हाईस चेअरमन सचिन थोरात, विकास यादव, गोविंद सोळंके,सुनील यादव,महादेव खुळे, विष्णू सोळंके, बाबूराव सोळंके, सुरेश जाधव तसेच शेकडो शेतकरी तहसील कार्यालयात उपस्थित होते.

शासनाने मंजूर केलेले अतिवृष्टीचे अनुदान अर्ध्याहुन अधिक शेतकऱ्यांना प्राप्त झाले नाही. रब्बी पेरणीसाठी च्या अनुदानाची ही तीच परिस्थिती आहे. फार्मर आयडी असताना शेतकऱ्यांना या समस्येला सामोरे जावे लागत आहे. माझ्या कोळपिंप्री या एकट्या गावात जवळपास दीडशे पात्र शेतकरी अनुदान पासून अद्याप वंचित आहेत. तहसील प्रशासनाकडे याबाबत चौकशी केली असता कायम उडवाउडवीची उत्तरे दिली जातात.

तुषार खुळे
उपसरपंच कोळपिंपरी

# धारूर नगरपालिकेच्या रणधुमाळीत १९४ चिन्हांची रंगत

## भेंडी विरुद्ध मिरची फणस विरुद्ध कणीस अशीही लढत होऊ शकते

धारूर । प्रतिनिधी

धारूर नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी आता रंगात आली असून, यंदाच्या निवडणुकीला वेगळी झळाळी देणारी बाब म्हणजे प्रशासनाने जाहीर केलेली १९४ निवडणूक चिन्हांची यादी. या यादीत भाजीपाला, फळे, धान्य, शेतीशी संबंधित साधने आणि घरगुती वस्तू अशा विविध प्रतीकांचा समावेश करण्यात आला आहे.

१० नोव्हेंबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली असून, अर्ज भरताना उमेदवारांना संभाव्य चिन्हाची मागणी करावी लागणार आहे. अपक्ष उमेदवारांना क्रमवारीनुसार चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. यासाठी मंगळवारी पालिका कार्यालयासमोर १९४ चिन्हांचा आकर्षक फलक लावण्यात आला असून, नागरिक आणि उमेदवारांचे त्याकडे मोठे लक्ष वेधले गेले आहे.

यंदाच्या निवडणुकीत पारंपरिक चिन्हांबरोबरच काही नवी आणि रंजक प्रतीकेही समाविष्ट करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, मागील निवडणुकीत लोकप्रिय ठरलेली केळी, गाजर, टरबूज आणि नारळ ही चिन्हे यंदा वगळण्यात आली असून, त्यांच्या जागी भेंडी, हिरवी मिरची, ढोबळी मिरची आणि फुलकोबी या नव्या भाज्यांना स्थान मिळाले आहे. ही चिन्हे शेतकऱ्यांच्या मेहनतीचे आणि ग्रामीण संस्कृतीचे प्रतीक ठरत आहेत.

याचबरोबर भुईमुग शेंग, वटाणा शेंग, फणस, मका कणीस यांसारखी चिन्हे कृषी समृद्धीचे प्रतिनिधित्व करत आहेत. या प्रतीकांमधून ग्रामीण जनजीवन, श्रमशीलता आणि निसर्गाशी एकरूपता यांचे दर्शन घडते.

दरम्यान, अपक्ष उमेदवार आपल्या प्रचारासाठी प्रभावी आणि लक्षवेधी चिन्ह निवडण्यात गुंतले आहेत. काही उमेदवार साधेपणाचे प्रतीक असलेले चिन्ह पसंत करत आहेत, तर काहीजण आकर्षक प्रतीकांवर नजर ठेवून आहेत.धारूर नगरपालिकेच्या निवडणुकीतील ही ‘भेंडी विरुद्ध मिरची’, ‘फणस विरुद्ध मका कणीस’ अशी प्रतीकात्मक लढत आता चर्चेचा विषय ठरत आहे. उमेदवारांची संख्या वाढल्यास मतदारांसमोर आणखी अनेक नव्या चिन्हांची झलक दिसणार आहे.धारूरचा राजकीय पट आता खरंच भाजीपाला आणि शेतमालाच्या रंगांनी रंगू लागला असून, येत्या काही दिवसांत प्रचाराची धग आणखी तीव्र होणार आहे.

# घनसावंगीतील इदगाह मोहल्ल्यात विजेचा खांब कोसळण्याच्या मार्गावर

## महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण अपघाताची वाट पाहतेय महावितरण ?

घनसावंगी /प्रतिनिधी :- घनसावंगी येथील वार्ड क्र. १ मधील इदगाह मोहल्ल्यातील विद्युत खांब कोसळण्याच्या मार्गावर असून परिसरात सध्या भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तरीही महावितरण कंपनी मात्र कानावर हात ठेवून झोपलेली दिसते एम.टी.आर. १४०९ क्रमांकाचा विजेचा खांब जो अजूनही सक्रिय विद्युत पुरवठा सुरू असताना वापरला जातो त्याच्या खालच्या बाजूला एका अज्ञात व्यक्तीने तोडफोड केली आहे. त्यामुळे या भागातील विद्युत पुरवठा खंडित झाला असून खांब केव्हाही कोसळून मोठा अपघात घडू शकतो अशी दाट शक्यता आहे.



परिसरातील नागरिकांनी तातडीने ही माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना दिली असतानाही, कोणतीही तत्काळ कारवाई करण्यात आलेली नाही. शहर अभियंता आणि स्थानिक कर्मचाऱ्यांच्या सावधतेच्या अभावामुळे नागरिकांच्या जिवाशी खेळ सुरू असल्याची लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

महावितरणला एखादा अपघात घडल्याशिवाय जाग येणार नाही का ?असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. परिसरातील महिलांपासून ते लहान मुलांपर्यंत सगळेच या धोकादायक खांबामुळे अतोनात भीतीत जगत आहेत.

महावितरण कंपनीच्या ढिसाळ व निष्काळजी कारभारामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. तात्काळ कारवाई करून हा धोकादायक खांब बदलावा आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी स्थानिक नागरिकांची तीव्र मागणी आहे.

# मॉडर्न इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचा आदर्श उपक्रम

## चिमुकल्या विद्यार्थ्यांकडून आजोळ वृद्धाश्रमास भेट

मानूर /प्रतिनिधी ह्व

मॉडर्न इंग्लिश स्कूल, शिरूर येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी समाजातील जेष्ठ नागरिकांविषयी आदर आणि आपुलकी व्यक्त करत एक स्तुत्य उपक्रम राबविला. शाळेतील विद्यार्थ्यांनी ‘आजोळ’ या वृद्धाश्रमास भेट देत आजी-आजोबांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, त्यांच्यासोबत वेळ घालवला आणि त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवले.




या भेटीचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे - विद्यार्थ्यांनी स्वतःच्या खिशातून पैसे जमा करून वृद्धाश्रमातील रहिवाशांसाठी खाऊ आणि फळे खरेदी केली. त्यांच्या या छोट्याशा प्रयत्नाने आनंद देण्यातच खरा आनंद असतो हे सिद्ध केले.

या प्रसंगी ‘आजोळ’ परिवाराचे संचालक कर्ण तांबे यांनी विद्यार्थ्यांचे आणि शाळेचे कौतुक करत, नवीन पिढीमध्ये संवेदनशीलतेचा हा अंकुर समाजाला मोठा आधार ठरेल असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे मार्गदर्शन मॉडर्न इंग्लिश स्कूलचे प्राचार्य माही सर यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांना वृद्धांचा सन्मान करणे हे आपल्या संस्कृतीचे खरे वैशिष्ट्य आहे असे सांगून प्रेरणादायी विचार मांडले.विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे शाळेचे शिक्षकवृंद आणि पालकांनी कौतुक केले असून समाजसेवेची ही शिकवण त्यांच्या आयुष्यात नक्कीच सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# आष्टीत किशोर हंबर्डे यांचा वाढदिवस सेवाभावी उपक्रमांनी साजरा

## ५८ रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचा संदेश जिवंत ठेवला

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर हंबर्डे यांच्या वाढदिवसानिमित्त विधिज्ञ बि. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी येथे आयोजित विविध सेवाभावी व विद्यार्थी - केंद्रित उपक्रमांचा भव्य उत्सव यशस्वीरीत्या संपन्न झाला. सामाजिक मूल्यांना प्राधान्य देत वाढदिवसाची अनोखी साजरी पद्धत सर्वांच्या कौतुकास्पद ठरली.

उत्सवाचे प्रमुख आकर्षण असलेल्या भव्य रक्तदान शिबिराला विद्यार्थ्यांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण ५८ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक रक्तपिशवी - तीन जीव या संदेशाला खरं रूप दिलं. तरुण रक्तदात्यांचा उत्साह आणि संघटित पद्धतीने पार पडलेले शिबिर या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

याच दिवशी महाविद्यालयातील शिक्षक व छात्र स्वयंसेवकांनी स्थानिक रुग्णालयात भेट देत रुग्णांना फळवाटप केले. रुग्णांच्या चेहऱ्यावर उमटलेली आनंदाची झळाळी आणि विद्यार्थ्यांमधील संवेदनशीलता या उपक्रमाचा सकारात्मक परिणाम दर्शवणारी होती. अलीकडील पुरपरिस्थितीत अडचणीत सापडलेल्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत महाविद्यालयात शालेय साहित्याचे वाटप




करण्यात आले. पुस्तकं, वह्या, पेन, दप्तर इत्यादी शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आणि त्यांच्या अभ्यासक्रमात सातत्य राखण्यास प्रोत्साहन मिळाले. वाढदिवस कार्यक्रमाच्या निमित्ताने ४ ते १० नोव्हेंबर दरम्यान विद्यार्थ्यांसाठी लिंबू चमचा, तीन पाय दौड आणि क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला आणि विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली. त्याचबरोबर मेनेजमेंट थीम डे मुळे महाविद्यालयाचा कॅम्पस आनंद, उत्साह आणि रंगत यांनी नटला.

या उपक्रमांना संस्था उपाध्यक्ष दिलीप वर्धमाने, सचिव अतूल मेहेर, कोषाध्यक्ष गणेश पिसाळ, संचालक सुभान पठाण, विश्वनाथ शिंदे यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाचे कौतुक केले. तसेच सामाजिक क्षेत्रातील पंचायत समिती माजी सभापती बद्रीनाथ जगताप, सरपंच श्याम धस, सुधीर पठाडे, रमेश भोगाडे, अशोक पोकळे तसेच आष्टी नगरपंचायत अध्यक्ष जिया बेग, सरपंच अशोक मुळे, सरपंच संदिप खेडकर, जितेंद्र शिंदे, रामा जगताप, शहादेव नरवडे, अहिल्यानगर येथील सुरभी ब्लड बँकेचे डॉ. राजेंद्र पवार, ज्ञानेश्वर पोकळे अशा विविध सामाजिक, औद्योगिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमाची शान वाढवणारी ठरली. या सर्व उपक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सोपानराव निंबोरे, उपप्राचार्य अविनाश कंदले, डॉ. बाबासाहेब मुटकुळे, पर्यवेक्षक अशोक भोगाडे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. रवी सातभाई, महेंद्र वैरागे, सुहास गोपणे, राम आगलावे, शिवाजी कोकणे यांनी मेहनत घेतली. उपक्रमांच्या माध्यमातून सामाजिक जबाबदारी, सेवाभाव आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा सुंदर संगम साधत किशोर हंबर्डे यांच्या वाढदिवसाचा उत्सव समाजाभिमुख पद्धतीने अविस्मरणीय ठरला.

# जालनाच्या तेजल साळवेची आशिया कपसाठी भारतीय संघात निवड;अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीचा अभिमानास्पद पराक्रम

फारुक शेख :- जालना मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या अंकुशराव टोपे महाविद्यालय जालनाची विद्यार्थिनी कु.तेजल राजेंद्र साळवे हिची आगामी आशिया कप धनुर्विद्या स्पर्धेसाठी भारतीय संघात निवड झाली असून ही स्पर्धा सौदी अरेबिया येथे होणार आहे.तेजलने नुकत्याच संपन्न झालेल्या आंतरविद्यापीठीय क्रीडा स्पर्धेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करताना वैयक्तिक गटात सुवर्णपदक पटकावले. या कामगिरीमुळे विद्यापीठास धनुर्विद्या क्रीडा प्रकारात इतिहासात प्रथमच सुवर्णपदक मिळाले आहे.ही स्पर्धा पंजाबमधील भटिंडा येथे पार पडली होती ज्यात देशातील अनेक नामांकित विद्यापीठांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता.स्पर्धेत तेजलने केवळ वैयक्तिक सुवर्णपदकच नाही तर एकूण दोन सुवर्णपदके आणि मिश्र दुहेरीत ब्रॉन्झ पदक जिंकून उत्कृष्ट कामगिरीची नोंद केली. आत्तापर्यंत तेजलने



विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधून चार पदके आणि राष्ट्रीय स्तरावर तब्बल १७ पदके जिंकत धनुर्विद्येत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. तिच्या या सातत्यपूर्ण आणि नेत्रदीपक कामगिरीच्या जोरावरच तिला आशिया कपसाठी भारतीय संघात स्थान मिळाले आहे.तेजलच्या या यशाबद्दल मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा.आ. राजेशभैय्या टोपे,सचिव सौ. मनिषाताई टोपे,प्रशासकीय अधिकारी डॉ.बी.आर. गायकवाड,प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस,उपप्राचार्य संजय पाटील,प्रा.पांडुरंग खोजे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ.भुजंग डावकर यांसह प्रा.चंद्रकांत लाटेकर,प्रा.रामप्रसाद भालेकर, डॉ.पंडित रानमाळ,डॉ.कार्तिक गावंडे,डॉ.रामदास वैद्य, कार्यालयीन अधीक्षक श्री.सुरेश चव्हाण,डॉ.शंकर तिकांडे यांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

अंबाजोगाई /प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल किरकोळ फौजदारी अर्ज क्रमांक ५३१/ २०२५ (संदीप विरुद्ध गोविंद) या प्रकरणात मा. न्यायालयाने आरोपी गोविंद सुधाकर देशमुख (रा. मोहा, ता. परळी, जि. बीड) यास दिनांक १० नोव्हेंबर २०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आरोपीच्या वतीने ड. आर. एम. धायगुडे यांनी काम पाहिले.



प्रकरणातील फिर्यादी विष्णू नामदेव शेंडगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, पोलीस स्टेशन शिरसाळा येथे गु.र. क्र. २६२/ २०२५ हा गुन्हा कलम १२३, २७४, २७५ भारतीय न्यायसंहिता (इछड) अंतर्गत दाखल करण्यात आला होता. फिर्यादीनुसार, आरोपीच्या घराच्या पाठीमागील शेडमध्ये प्रतिबंधित पान मसाल्याचा साठा आढळल्याचा आरोप करण्यात आला होता.

या गुन्ह्यात अटक होण्याची शक्यता असल्याने आरोपीने अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला होता. मा. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर केला.या प्रकरणात आरोपीच्या वतीने ड. आर. एम. धायगुडे यांनी काम पाहिले, तर ड. जी. डी. कांदे, ड. डी. ए. लोंढाळ, ड. अविनाश धायगुडे, ड. ओ. ए. लोंढाळ, ड. दयानंद गडदे आणि ड. पी. पी. धायगुडे यांनी सहकार्य केले.

# वडवणी तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्था प्रहार जनशक्ती पक्ष स्वबळावर लढवणार

## तालुका अध्यक्ष संकेत लंगडे यांची माहिती

वडवणी/प्रतिनिधी

राज्यामध्ये सध्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची धामधूम येणाऱ्या काळात लवकरच चालू होणार आहे, त्या अनुषंगाने राज्यातील सर्वच पक्ष चे उमेदवार कार्यकर्ते कामाला लागलेले आहेत, याचबरोबर अनेक पक्षाचे अध्यक्ष त्यांचे कार्यकर्ते सर्कलमध्ये कामाला लागले असल्याचे दिसत आहे, प्रहार हा जनशक्ती पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक भुमिका मांडणारा पक्ष आहे, दिव्यांग बांधवांच्या प्रश्नासाठी शासन दरबारी हा पक्ष कायम सक्रिय असतो, त्याच अनुषंगाने वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गण हा प्रहार जनशक्ती पक्ष स्वबळावर लढवणार असल्याची माहिती प्रहार जनशक्ती पक्षाचे वडवणी तालुका अध्यक्ष संकेत लंगडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केली आहे,



# अखेर सुरू झाली जालना-बदनापूर-पाचोड बस सेवा प्रवासी नागरिकांचा आनंद

## आ.नारायणराव कुचे यांच्या पाठपुराव्याला यश ग्रामीण प्रवाशांना मोठा दिलासा



रोहिलागड /प्रतिनिधी

बदनापूर तालुक्यातील नागरिकांची गेल्या अनेक वर्षांपासूनची जालना-बदनापूर-पाचोड बस सेवेची मागणी अखेर पूर्ण झाली आहे.जालना विभागीय नियंत्रण अधिकारी यांनी ही बस सेवा सुरू केल्याने बदनापूर तसेच अंबड तालुक्यातील प्रवासी नागरिक आणि भाविक भक्तांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली ही बस सेवा सुरू करण्यासाठी आमदार नारायणराव कुचे यांनी प्रवासी जनतेची होत असलेली गैरसोय लक्षात घेऊन विभागीय नियंत्रक अधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे विनंती केली होती.त्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत अखेर ही बस सेवा सुरू करण्यात आली.लोणारभायगाव येथील बसस्थानकावर सकाळी ८.४५ वाजता बस दाखल होताच नागरिकांनी फुलांच्या वर्षावाने बसचे पूजन केले.बसवरील चालक आणि वाहकांचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.त्यानंतर जामखेड येथेही प्रवासी वर्गाने चालक-वाहकांचा गौरव केला.

ही बस सेवा जालना बसस्थानकावरून सकाळी ७.३० वाजता सुटेल बदनापूर येथे ८ वाजता पोहोचेल व रोषणगाव-नानेगाव-लोणारभायगाव-जामखेड मार्गे जात सकाळी ९.३० वाजता पाचोड येथे पोहोचेल.परतीची फेरी पाचोडवरून सकाळी ९.४५ वाजता सुटून जालना येथे ११.४५ वाजता पोहोचेल. सायंकाळी ही बस जालना येथून ४ वाजता सुटून बदनापूर, रोषणगाव,नानेगाव,जामखेड मार्गे ६.३० वाजता पाचोडला पोहोचेल व परत त्याच मार्गाने जालना येथे येईल.या बस सेवेच्या सुरूवातीमुळे बीड, पंढरपूर,अहमदनगर,मोहटादेवी, राक्षभुवन व छत्रपती संभाजीनगर या धार्मिक व व्यावसायिक ठिकाणी जाणाऱ्या भाविक व प्रवाशांना मोठी सोय झाली आहे.यामुळे प्रवासाचा वेळ, खर्च आणि गैरसोय मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

या वेळी पूजन कार्यक्रमात ह.भ.प.रघुनाथराव महाराज टकले,रामेश्वर भोजने,दीपक टकले,गणपत जाधव,अशोक भोसले,अशोक वैद्य,नारायण जाधव,शंकर बुनगे,आसाराम जाधव,रामेश्वर गायके,पुरुषोत्तम जाधव,अशोक पवार,जनार्धन दसपुते,विकास पवार,सूरज काळे, साईनाथ बोबले यांच्यासह अनेक गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भाजप जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीला लागली

केज/प्रतिनिधी

भारतीय जनता पक्ष जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या आगामी निवडणुकीसाठी सज्ज झाला असून केज तालुक्यातील शिरूरघाट येथील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. याप्रसंगी सर्वांना प्रवेश देऊन त्यांचे पक्षात स्वागत केले.आगामी काळात पक्षाचे ध्येयधोरण आणि विकासकामे ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्यां पर्यंत पोहोचवण्यासाठी सक्रिय राहून पक्षकार्य करू असा निर्धार याप्रसंगी सर्वांनी व्यक्त केला.यावेळी शिरूरघाट ता.केज येथील माजी सरपंच सुंदर हजारे, अशोक गायकवाड, नवनाथ धेंडूळे,रवींद्र विडेकर,आश्रुबा घोडके, मारुती लोंढे,दिनकर केकाण,विकासभवलकर, रामेश्वर



पर्यावरण तथा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत बहुसंख्य कार्यकर्त्यांनी केला भारतीय जनता पक्षात प्रवेश

हजारे यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.बुधवारी संपन्न झालेल्या पक्षप्रवेशामुळे येणाऱ्या काळात पक्षाला निश्चित संघटनात्मक बळकटी मिळेल असा विश्वास व्यक्त केला जात आहे.याप्रसंगी संतोष हांगे,भगवान केदार,विष्णू भाऊ घुले,डॉ.वासुदेव नेहरकर यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रवेशा मुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

# संवेदनशील व जबाबदार विद्यार्थी घडवणे महत्त्वाचे - डॉ.इब्राहिम नदाफ

केज/प्रतिनिधी

दि.१२ नोव्हेंबर बुधवार रोजी येथील साने गुरुजी निवासी विद्यालयात सुलभकांचे जिल्हास्तरीय मुल्यवर्धन प्रशिक्षण ३.० चे उद्घाटन प्रसंगी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ.इब्राहिम नदाफ सर बोलत होते.आज तुमच्या चेहऱ्यावर आनंद दिसतोय तो या आधी झालेल्या प्रशिक्षणाचे परिणामकारकता आहे. समाजातील वर्तनात सुधारणा करण्यासाठी, व्याख्यान पध्दतीने अध्यापना ज्ञान न देता अनुभुती मधुन,काव्य, कविताच्या माध्यमातून अध्यापन करुन मुलां मधील मुल्यवर्धित करावयाची आहेत.तसेच मुल्य रुजवायची आहेत. या मुलांमध्ये मुल्य रुजवून वर्धित झाल्यास विद्यार्थ्यां मध्ये संवेदनशिलता येईल व जवाबदारी घेण्यास ते निश्चित समक्ष बनतील व देशाला आहे.असे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. शांतीलाल मुथा फाउंडेशन चे श्री.राजेश्वर यांनी प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.योगेश सुरवसे यांनी यावेळी आपण एकात्मिकपद्धतीने अध्यापन करु



त्यावेळेस आपोआप मुल्य शिकवले जातील मुल्यवर्धन प्रशिक्षणातून ऊर्जा मिळणार आहे.तसेच प्रशिक्षणाची पार्श्वभूमी मांडली.यावेळी सदर प्रशिक्षण हे दुस-या टप्यात चार चार दिवस निवासी स्वरूपाचे असुन पहिल्या टप्प्यात २५० व दुसऱ्या टप्प्यात २००असे प्रशिक्षणार्थी सहभागी होणार आहेत.पहिल्या टप्प्यात केज, पाटोदा, आष्टी,धारुर,परळी, अंबाजोगाई दि.१२ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर या कालावधीत होणार आहे तसेच दुसरा टप्पा १९ नोव्हेंबर ते २२ नोव्हेंबर या कालावधीत संपन्न होत आहे.या वेळी व्यासपीठावर अँड. उद्धवराव कराड,जेष्ठ अधिव्याख्याता जयपाल कांबळे,जेष्ठ अधिव्याख्याता डॉ.राजेश गोरे उपस्थित होते.तर पहिल्या टप्प्यातील सर्व शिक्षक,शिक्षिकाउपस्थित होत्या कार्यक्रमाचे सुत्र संचालन अरुण शिंदे, यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ.कविता गित्ते-कराड मॅडम यांनी मांडले कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून व सांस्कृतिक विभाग प्रमुख शेख मॅडम,पवन चंदनशिव,कृष्णा नागरगोजे यांच्या संचाने स्वागतगीत गायन करुन करण्यात आले.

# अंबाजोगाई शहरातील असंख्य युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

अंबाजोगाई (प्रतिनिधी):- अंबाजोगाई शहरातील विविध प्रभागातील तरुण युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. अंबाजोगाई शहराचे विकास पुरुष माजी नगराध्यक्ष यांच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन तसेच त्यांनी अंबाजोगाई शहराचा मागील पंचवीस वर्षात केलेला विकास पाहून शहरातील युवा कार्यकर्ते अनिकेत पटाईत व युवराज पटाईत, मुनिर शहा व भीमसेन लोमटे यांच्या माध्यमातून अनेक युवकांनी जाहीर पक्षप्रवेश केला. पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार , प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, जिल्हाध्यक्ष ऍड राजेश्वर चव्हाण , तसेच युवा जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या विचारांवर प्रेरित होऊन तसेच त्यांचेच विचार गावपातळीवर पोचवण्यासाठी अंबाजोगाई शहरातील विविध भागातून




शेकडो युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. या पक्षप्रवेश सोहळ्या प्रसंगी युवा नेते तथा श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, सुनील वाघाळकर,अंकुश हेडे, निसार बेग,महेश कदम, शुभम टेकाळे, प्रशांत टेकाळे महेश वाघमारे, आकाश वाघमारे, दत्ता काळे, सुरज चव्हाण, वैभव टेकाळे, वेदांत काटे, महेश्वर सुरवसे, रोहित गंजेवार यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केलेल्यामध्ये प्रामुख्याने अनिकेत पटाईत व युवराज पटाईत यांच्या माध्यमातून नामदेव पवार, बालाजी सुरवसे, महेश शिंदे, ऋषिकेश पटाईत, गुलाब भवर, पवन भवर, किशोर जेधे, आदित्य सोमवंशी, बिरू शिंपले, कृष्णा जेधे, सुरज काळजाते, पंकज काळदाते, किरण पाथरकर, अनिकेत शिंदे, ओम शिंदे, शाहिद सय्यद, अविनाश हेडे, मानव काळदाते, अजय पटाईत, स्वप्निल पटाईत, शुभम शिर्के, दत्तात्रय जेधे आणि अनिकेत घोडके त्याचबरोबर

शहरातीलच अर्जुन चौरे, राजू थाटकर, प्रमोद थाटकर, अशोक खामकर, नरेश सोमवंशी, भागवत काळे आणि अनिकेत शेवाळे या उत्साही तरुणांचा समावेश आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांच्या प्रवेशाने पक्षात नवीन उर्जा आणि उत्साह संचारला असून स्थानिक कार्यकर्त्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले आहे. अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने या सर्व युवकांनी पक्षाच्या विचारधारेवर व नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. पक्षात जाहीर प्रवेश केलेल्या युवकांची ऊर्जा व त्यांच्या कार्य तत्परतेतून पक्षाचे कार्य अधिक मजबूत व बळकट होईल असा विश्वास याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

आजचा नवयुवक हा देशाचे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे युवकांनी शिकून संघटित होऊन आपल्या समाजासाठी पर्यायाने देशासाठी कार्य करावे असे मत संकेत मोदी यांनी व्यक्त केले. पक्षप्रवेश झालेल्या सर्व युवकांचे अभिनंदन करून त्यांना आपापल्या प्रभागात पक्षाचे विचार घरोघरी पोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन देखील यावेळी राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांनी केले.




# दिव्यांग बालकांसाठी विशेष तपासणी, शिबिर २५५ बालकांची सविस्तर वैद्यकीय तपासणी

प्रतिनिधी ।धारूर

शासकीय रुग्णालय, बीड व गटसाधन केंद्र, धारूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बालकांसाठी विशेष वैद्यकीय तपासणी शिबिराचे आयोजन दिनांक ११ नोव्हेंबर रोजी गटशिक्षण कार्यालयाच्या सभागृहात करण्यात आले. या शिबिराचा उद्देश विशेष गरज असणाऱ्या बालकांना दिव्यांग प्रमाणपत्र मिळविण्यासाठी आवश्यक वैद्यकीय तपासणी एकाच ठिकाणी करून देणे हा होता.

या शिबिरात विविध तज्ञ डॉक्टरांनी आपल्या सेवांचा लाभ दिला. नेत्रतज्ज्ञ डॉ. भुसारी, फिजिशियन डॉ. बिडवई, ऑर्थोपेडिक तज्ज्ञ डॉ. म्हात्रे तसेच फिजिओथेरपिस्ट डॉ. स्नेहल सागर यांनी बालकांची सखोल तपासणी करून त्यांच्या आरोग्यविषयक नोंदी तयार केल्या. या शिबिरात एकूण २७६ दिव्यांग बालकांची नोंदणी करण्यात आली होती, त्यापैकी २५५ बालकांची प्रत्यक्ष तपासणी यशस्वीरीत्या पार पडली.

या तपासणीमुळे बालकांना आवश्यक प्रमाणपत्र मिळविण्यास मदत होणार असून, त्यांच्या शिक्षण, शैक्षणिक सुविधा तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी ही तपासणी उपयुक्त ठरणार आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, विस्तार अधिकारी शिवाजी अंडी, तसेच गटसाधन केंद्रातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. शिबिराच्या शेवटी सर्व तज्ञ डॉक्टरांचे व उपस्थित अधिकारी-कर्मचारी यांचे आभार मानण्यात आले. या उपक्रमामुळे धारूर तालुक्यातील विशेष बालकांना शासनाच्या मुख्य प्रवाहात आणण्यास मदत होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला

# आदर्श शिक्षक , वात्रटिकाकार भागवत मसने प्रेरणादायी शिक्षक २०२५ या पुरस्काराने सन्मानित

अंबाजोगाई (प्रतिनिधी) :- फाउंडेशन फॉर एज्युकेशन अँड कम्युनिटी वेल्फेअर पुणे, यांच्यातर्फे अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षक तथा वात्रटिकाकार, कविवर्य भागवत मसने याना प्रेरणादायी शिक्षक पुरस्कार २०२५ देऊन नुकताच सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार सन्मान सोहळा दि ९ रोजी पुणे येथे पदमजी हॉल पुणे येथे संपन्न झाला. हा पुरस्कार प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, (अण्णासाहेब मगर महाविद्यालय हाडपसर, पुणे) , प्राचार्य शेख आफताब(पूना कॉलेज पुणे) , इम्तियाज आगा (उपप्राचार्य पुना कॉलेज पुणे) तसेच सामाजिक कार्यकर्ते विलास लोंढे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भागवत मसने यांना यापूर्वी अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ज्यामध्ये साहित्य, शैक्षणिक व सामाजिक पुरस्काराचा समावेश आहे.कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय सन्मान, शिवजागर प्रतिष्ठाण चा महाराष्ट्र रत्न पुरस्कार, मैत्री फाउंडेशन बीडचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, तसेच आदर्श साहित्यिक पुरस्कार या पुरस्काराने भागवत मसने यांचा यापूर्वी सन्मान करण्यात आला आहे. भागवत रामकृष्ण मसने हे हिंदी विषयात एम ए बी एड असून त्यांना के. के. एम. कॉलेज मानवत येथे वाद विवाद स्पर्धेत मराठवाडा स्तरावरील स्पर्धेचे पहिले बक्षीस मिळाले. महाविद्यालयीन जीवनात वाद विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा यामध्ये एकूण ३२ पारितोषिके मिळवली आहेत.

एम ए हिंदी पूर्ण झाल्यानंतर श्री योगेश्वरी महाविद्यालय वरिष्ठ स्तरावर प्राध्यापक म्हणून सात वर्ष काम करताना अनेक विद्यार्थी वक्तृत्व




वादविवाद स्पर्धेत घडवले.

भागवत मसने यांनी स्वतः पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणीवर सादर केले. मागील अनेक वर्षापासून विविध विद्यालय तथा महाविद्यालयात स्वतःचा हास्य व्यंगात्मक कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सादर केले आहेत. गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेचे उत्तम असे परीक्षण करत आहेत. त्याचबरोबर अनेक कवी संमेलनाचे उत्तम व बहारदार असे सुत्रसंचलन करत आहेत. भागवत मसने यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होऊन शुभेच्छाचा वर्षाव केल्या जात आहे.




# मनमंदिर प्रकल्प,धाकलगाव येथे हंस फाउंडेशन तर्फे किराणा किट वाटप

अंबड /प्रतिनिधी

समाजातील वंचित घटकांपर्यंत सेवाभावाने पोहोचण्यासाठी कार्यरत असलेल्या हंस फाउंडेशन या संस्थेने पुन्हा एकदा आपल्या समाजसेवेची सुंदर परंपरा कायम ठेवली आहे. फाउंडेशनतर्फे मनोरुग्णांच्या सेवार्थ कार्यरत मनमंदिर प्रकल्प, धाकलगाव येथे किराणा किट वाटप उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमात हंस फाउंडेशनचे प्रतिनिधी माऊली दोबोले,योगेश हेंद्रे,जालिंदर चोरमले तसेच स्थानिक सेवक उपस्थित होते.फाउंडेशनच्या टीमने प्रकल्पातील सर्व मनोरुग्णांशी संवाद साधत त्यांची विचारपूस केली आणि त्यांच्या दैनंदिन गरजांचा आढावा घेतला. त्यानंतर आवश्यक वस्तूंचा समावेश असलेले किराणा किट वाटप करण्यात आले.या प्रसंगी मनमंदिर प्रकल्पाचे महादेव पवार यांनी हंस फाउंडेशनच्या या संवेदनशील उपक्रमाचे मनःपूर्वक आभार मानले.अशा समाजाभिमुख उपक्रमांमुळे दुर्लक्षित घटकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण होतो



# गेवराई शहराच्या सर्वांगीन विकासासाठी माझ्या पदरात मतांचा आशिर्वाद द्या-सौ. शितलताई दाभाडे

गेवराई (प्रतिनिधी) विकासाचा ध्यास असणारे आमचे नेते अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ.विजयसिंह पंडित यांनी कोट्यवधी रुपयांची विकासकामे आणली आहेत, ती दर्जेदार झाली पाहिजेत यासाठी नगर परिषदेची सत्ता आपल्या हाती असते गरजेचे आहे. गेवराई शहराच्या सर्वांगीन विकासासाठी माझ्या पदरात मतांचा आशिर्वाद द्या असे भावनिक आवाहन सौराष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शितलताई दाभाडे यांनी केले. गेवराई शहरातील मतदारांच्या गाठीभेटी दरम्यान त्या बोलत होत्या.

गेवराई नगरपरिषद निवडणुकी मधील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ.शितलताई महेश दाभाडे यांच्या प्रचारार्थ संजय नगर येथील सय्यद रफिक भाई यांच्या निवासस्थानी कॉर्नर बैठकीत बोलताना त्या पुढे म्हणाल्या की सर्वसामान्य मतदारांना योग्य तो न्याय देण्यासाठी व त्यांच्या असणाऱ्या समस्या सोडवण्यासाठी माझ्यासारख्या सर्वसामान्य व्यक्तिमत्त्वाला संधी द्या गेवराई शहराच्या प्रत्येक प्रभागांमध्ये चांगल्या दर्जाचे रस्ते व नाली बांधकाम व दिवाबत्ती यांची योग्य सोय सर्वसामान्य नागरिकांना उपलब्ध करून दिली जाईल. प्रत्येक प्रभागांमध्ये वयोवृद्धांना ओपन स्पेस मध्ये बसण्यासाठी आसन व्यवस्था लहान लहान बालकांना विविध खेळ खेळण्यासाठी मैदाने उपलब्ध करून दिली जातील त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या घड्याळ या चिन्हावर मताचे दान द्या असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला प्रदेशाध्यक्ष मुक्ताताई आर्दड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महिला आघाडी शहर अध्यक्षा पल्लवी ताई गोगुले, वैष्णवी दाभाडे,सय्यद रुकसाना, सय्यद जेबुनिसा, बिल्कीस बानो, सय्यद नगमा, माधूरी बांडे, नसरीन हरभट, फसी हरभट, अश्विनी बांडे, जयश्री भापकर, रब्बू भाबी, फरवीन शेख, मुमताज शेख, शरीन शेख, जे के बाबू, सय्यद सुभान, निजाम भाई, सय्यद रफीक, नारायण पवार, अमर सय्यद, गफूर पटेल, इम्रान सय्यद, कौसर भाई, पप्पू बांडे, सय्यद सद्दाम, अस्लम शेख, सय्यद हरुन, सय्यद खाजा, शेख हादी, शेख नय्यूम, अफसर भाई यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने मतदार बांधव उपस्थित होते.



## माजलगाव नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकीत काँग्रेस पक्षाकडून सहनिरक्षक पदी दत्ता कांबळे यांची तात्काळ प्रभावाने नियुक्ती

माजलगाव :(प्रतिनिधी ): महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस पक्षाच्या सूचनेनुसार जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांच्या नेतृत्वात नुकतीच होऊ घातलेल्या नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक प्रभावी हाताळण्यासाठी काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या पक्षीय कार्याची दखल घेऊन काँग्रेस पक्षाकडून तात्काळ प्रभावाने नगरपरिषद सार्वत्रिक



निवडणूक माजलगावच्या सहनिरक्षक पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे हे सामाजिक चळवळीतील अग्रेसर नाव असून, पक्षीय कार्यप्रणालीत कायम इमाने इतबारे कामकाज करण्याची त्यांची हातोटी व संघटन कौशल्य याची पक्षश्रेष्ठीने दखल घेत दत्ता कांबळे यांच्या सह इतर जुबेर चाऊस यांची निरीक्षक तर नारायण होके, अफरोज तांबोळी, महावीर मस्के यांची सहनिरीक्षपदी नियुक्ती खासदार सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रांताध्यक्ष हर्षवर्धनजी सपकाळ यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे पाटील यांच्या स्वाक्षरीने ही तात्काळ प्रभावाने नियुक्ती करण्यात आली.

# भाजपला जामखेड सर्कलमध्ये जबर धक्का

## आ.नारायण कुचे यांचे विश्वासू कार्यकर्ते पंकज मंडलिक व पं.स.सदस्य भगवान भोजने यांचा शिंदे गटात जाहीर प्रवेश- शेकडो कार्यकर्त्यांचा मामा चौकात ऐतिहासिक मेळावा

जामखेड /प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड सर्कलमध्ये भाजपला आज प्रचंड राजकीय धक्का बसला आहे.आमदार नारायण कुचे यांचे विश्वासू आणि कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे पंकज मंडलिक तसेच पंचायत समिती सदस्य भगवान भोजने यांनी भाजपला रामराम ठोकत शिवसेना शिंदे गट मध्ये जाहीर प्रवेश केला आहे. हा ऐतिहासिक प्रवेश दि.१२ नोव्हेंबर रोजी जालना येथील मामा चौकात झाला. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि जालना जिल्हा उपप्रमुख भालचंद्र भोजने यांच्या नेतृत्वात शेकडो कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून भाजपच्या संघटनात्मक पायावर घणाघात केला.या कार्यक्रमात जामखेड सर्कलमधील शेकडो कार्यकर्त्यांनी शिंदे गटात प्रवेश केला. पंकज मंडलिक आणि भगवान भोजने यांच्यासह नवनाथ धुळे.ग्रा.पं.स.,वैजिनाथ भोजने, सुरज पांढरे, देवलाल मंडलिक,बाबासाहेब भोजने, मनोज निलाखे,एकनाथ दिवटे, पांडुरंग नेमाने,नारायण भोजने, सुभाष भोजने,अंबादास मंडलिक,परमेश्वर भोजने, धनाजी मंडलिक,शिवराम मस्के, गणेश भोजने, ज्ञानेश्वर मोरे, सुधाकर चेडे, मनोहर महाराज मोटे,सिताराम बाबा चिंचखेडे माजी पं.स.सदस्य,गणेश चिंचखेडे, भुशन पांढरे,सुभाष पागिरे ग्रा.प.सदस्य,शंकर भोजने, शिवाजी भोजने,गोपाल तार्डे,तात्यासाहेब तार्डे आदींचा यात समावेश होता.

या प्रवेशामुळे जामखेड सर्कलमधील भाजपची संघटनात्मक ताकद डळमळीत झाली असून शिंदे गटात नवा उत्साह आणि बळ निर्माण झाले आहे.पंकज मंडलिक हे गेल्या अनेक वर्षांपासून भाजपच्या माध्यमातून सामाजिक व राजकीय पातळीवर सक्रिय असून जनतेशी थेट संवाद, सामाजिक भान आणि जनहितासाठीची तत्परता यामुळे त्यांची ओळख मजबूत होती. मात्र,स्थानिक स्तरावर कार्यकर्त्यांचे दुर्लक्ष, विकास प्रश्नांकडे दुर्लक्ष आणि वाढती अंतर्गत नाराजी यामुळे त्यांनी अखेर शिंदे गटाचा भगवा हाती घेतला.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर आम्हाला पूर्ण विश्वास आहे. जनतेच्या हितासाठी आणि जामखेडच्या




विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत असे वक्तव्य पंकज मंडलिक यांनी प्रवेशावेळी केले.

दरम्यान राजकीय वर्तुळात या हालचालीने मोठी खळबळ उडाली असून आमदार नारायण कुचे यांचे विश्वासू कार्यकर्ते शिंदे गटात गेल्याने भाजपला मोठे नुकसान होणार अशी चर्चा सुरू झाली आहे.जामखेड सर्कलमध्ये भाजपची पकड सैल होत असून शिंदे गटाने या प्रवेशाद्वारे आपली ताकद दाखवून दिली आहे.

## चंदनसावरगाव येथील जेष्ठ महिला सीताबाई भंडारे यांचे वृद्धापकाळाने दुखःद निधन



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चंदनसावरगाव येथील जेष्ठ महिला सीताबाई नामदेव भंडारे वय ९० वर्षे यांचे वृद्धापकाळाने बुधवार रोजी निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी शेतात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात मुले सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.चार मुले, चार मुली असा मोठा परिवार आहे.प्रेमळ स्वभावाच्या बाई म्हणून त्या सर्वपरिचित होत्या. रामकीसन,राधाकिसन, श्रीकिसन,दत्तात्रय यांच्या त्या आई होत.त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच परिसरात शोककळा पसरली आहे.

# जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या पादुका दर्शन सोहळ्याने बदनापूर नगरी भक्तिभावाने दुमदुमली

## ढोल-ताशांचा गजर,लेझीम पथक,शिलाई मशीन वाटप व सामूहिक गुरुपूजनाने सोहळा झाला अविस्मरणीय




बदनापूर /प्रतिनिधी

बदनापूर नगरी मंगळवार दि.११ नोव्हेंबर २०२५ रोजी अध्यात्म,भक्ती आणि सामाजिक कार्याने उजळून निघाली.अनंतश्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या पवित्र पादुकांच्या दर्शन सोहळ्याने संपूर्ण शहर भक्तिभावाने न्हाऊन निघाले.

कृषी विज्ञान केंद्रासमोर सिद्धिविनायक गणपती मंदिराजवळील विशाल मैदानावर हा सोहळा मोठ्या श्रद्धा,उत्साह आणि भक्तिभावाने पार पडला. सकाळी नगरातील प्रमुख रस्त्यांवरून ढोल-ताशांचा गजर, कलशधारी महिला,ध्वजधारी मंडळी,लेझीम व बँड पथक, वारकरी संप्रदाय अशा भव्य मिरवणुकीने संपूर्ण बदनापूर नगरी भक्तिरंगात रंगली.

स्वामीजींच्या सिद्ध पादुका आकर्षक सजवलेल्या रथातून नगरभ्रमण करताना भाविकांना दर्शन देत कार्यक्रम स्थळी पोहोचल्या.झालेल्या मंगल आरतीनंतर जगद्गुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या सामाजिक उपक्रमांतर्गत ४३ गरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करून समाजसेवेचा सुंदर उपक्रम राबविण्यात आला. त्यानंतर सामूहिक गुरुपूजनाचा सोहळा भक्तिभावाने संपन्न झाला.नानिजधाम येथून आगमन झालेल्या प्रवचनकार विद्या ताई परब यांनी उपस्थित भाविकांना अध्यात्मिक प्रबोधन केले. आजच्या कलियुगात नामस्मरणाचे महत्त्व अमूल्य आहे.व्यवहार आणि अध्यात्म यांचा समतोल साधल्यास जीवनात सुख, शांती आणि समाधान प्राप्त होते असे त्या म्हणाल्या.यानंतर झालेल्या महाआरती आणि उपासक दीक्षा सोहळ्यात हजारो युवक-युवतींनी सहभागी होऊन जीवनमार्गाचा नवा संकल्प केला.या सोहळ्याला आ. नारायण कुचे,माजी आ.कैलास गोरंट्याल, नगराध्यक्ष विलास जऱ्हाड,उपनगराध्यक्ष सय्यद मुजमील,भाजपा तालुकाध्यक्ष भगवान मात्रे,नगरसेवक गोरख खैरे, देवेश भैय्या पाथ्रीकर, प्रोटोकॉल सेक्रेटरी सुभाष जोजारे,मराठवाडा सहपीठप्रमुख विजय देशपांडे, जिल्हा निरीक्षक दत्ता घरत,जिल्हाध्यक्ष नवनाथ पवार यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सांगता पुष्पवृष्टी व फटाक्यांच्या आतषबाजीने अतिशय भव्य स्वरूपात करण्यात आली.सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी उत्सव सेवा समिती,जिल्हा सेवा समिती,तालुका सेवा समिती तसेच सर्व कार्यकर्त्यांनी अपार परिश्रम घेतले.मिरवणुकीत नगरसेवक गोरख खैरे,विठ्ठल शेलार,पत्रकार संजय भुजाळ, वाघसर,रेणुका देवी पतसंस्थेचे जगन्नाथ पुरी साहेब,पवन गिते, गोकुळ हुसे,दीपक खैरे,जैस्वाल, गोवर्धन खरात यांच्यासह फुलेनगर येथील महिला मंडळ व नगरातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# भाजपाची उमेदवारी मीळाल्यास सर्व ताकदीशी तयार मनोज मोरे टाकळीकर

नायगाव :- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा बिगुल वाजताच नायगाव तालुक्यातील बरबडा जिल्हा परिषद गटात राजकीय तापमान चढले आहे. हा गट खुल्या प्रवर्गासाठी खुला झाल्याने इच्छुकांची लगबग सुरू झाली असली तरी, भाजपच्या गोटात मनोज पाटील मोरे टाकळीकर या नावाची जोरदार चर्चा रंगत आहे.



ग्रामपातळीवर कार्यकर्त्यांची भक्कम माळ विणणारे मनोज पाटील मोरे यांनी गावोगावी संपर्क दौरे सुरू केले आहेत. शिवारातील शेतकरी, तरुणाई, महिलावर्ग आणि ज्येष्ठ नागरिक यांच्या भेटीगाठी घेत त्यांनी 'घरोघरी कमळ' फुलविण्याचा संकल्प केला आहे. त्यांच्या सभांमध्ये दिसणारा उत्साह आणि गर्दी पाहून प्रतिस्पर्धी गटांतही अस्वस्थता निर्माण झाल्याचे बोलले जाते.

अनेक वर्षांपासून पक्षनिष्ठ कार्यकर्ते म्हणून सक्रिय असलेल्या मोरे टाकळीकर यांनी सामाजिक, शैक्षणिक आणि विकासकामांत मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे या वेळी स्थानिक आणि निष्ठावंत कार्यकर्त्याला संधी द्या अशी मागणी बरबडा, वजीरगाव, टाकळी, कहाळा आणि परिसरातील जनतेकडून जोर धरत आहे.पक्षातील जाणकारांच्या म्हणण्यानुसार, जर मनोज पाटील मोरे टाकळीकर यांना उमेदवारी मिळाली, तर भाजपची ताकद या गटात दुपटीने वाढेल, तसेच कार्यकर्त्यांमध्ये नवा आत्मविश्वास व लढाऊ जिद्द निर्माण होईल.

दरम्यान, बरबडा गटातील ही निवडणूक भाजपसाठी प्रतिष्ठेची ठरणार असल्याचे राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय बनला आहे. अनेकांच्या नजरा आता पक्षश्रेष्ठींवर असून, मोरे टाकळीकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब होते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# काँग्रेस - वंचित बहुजन आघाडी एकत्र: सम-समानच्या आधारावर आघाडीची घोषणा

नांदेड /प्रतिनिधी

नांदेड जिल्ह्यातील नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांच्यात ऐतिहासिक आघाडीची घोषणा करण्यात आली आहे. ही घोषणा खासदार रविंद्र चव्हाण आणि वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद यांनी आज नांदेड येथे आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत केली.

या आघाडीचा पाया सम-समान- या तत्त्वावर आधारित असून, दोन्ही पक्षांनी स्थानिक स्तरावर जनहित, सामाजिक न्याय आणि लोकशाही मूल्यांच्या रक्षणासाठी एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.

आघाडी संदर्भातील जागावाटप व रणनीतीसंबंधी चर्चा बाळासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेनुसार वंचितच्या राज्य समितीमार्फत जिल्हा स्तरावरील टीमच्या माध्यमातून पार पडली. चर्चेनंतर ठरविण्यात आले की, नांदेड जिल्ह्यात होऊ घातलेल्या १३ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांमध्ये काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी संयुक्तपणे लढणार असून, पुढील निवडणुकांसाठीही परस्पर चर्चा करून निर्णय घेण्यात येईल अशी माहिती या संयुक्त पत्रकार परिषदेत देण्यात आली.

पत्रकार परिषदेत ओबीसी आरक्षणाच्या मुद्याचा विशेष उल्लेख करण्यात आला. २ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयावर न्यायालयीन निर्णय येईपर्यंत, ओबीसींच्या राखीव जागा फक्त जुण्या ओबीसींनाच दिल्या जाव्यात. अशी वंचित आघाडीने ठाम भूमिका मांडली. सदरील मागणीला शरद पवार यांनी दुजोरा दिल्याचा उल्लेखही यावेळी करण्यात आला . दोन्ही पक्षांनी सामाजिक समतेच्या भूमिकेला साथ देण्याचा निर्णय यावेळी घेतला आहे.



या पत्रकार परिषदेला काँग्रेसकडुन खा. रविंद्र चव्हाण, वंचितचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद, वंचितचे जिल्हाध्यक्ष शिवा नरंगले, माजी जिल्हाध्यक्ष प्रशांत इंगोले, माजी आमदार ईश्वरराव भोसीकर, काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, महानगर अध्यक्ष अब्दुल सत्तार, अनिल मोरे, माजी उपमहापौर आनंद चव्हाण,प्रवक्ते मुंतजीब, बापूसाहेब पाटील वंचितचे महासचिव श्याम कांबळे , महानगर अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, अमृत नरंगलकर, कैलास वाघमारे, आकाश जोंधळे, वैभव लष्करे, साहेबराव पंडित , सादिक बाचोटीकर, शुक्लोधन गायकवाड, नागेश धुतमल, अभय सोनकांबळे, कनिष्क सोनसळे, आदीसह दोन्ही पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नावामनपा नांदेड स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) स्वच्छता कर्मचाऱ्यांना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रशिक्षण व पिपीई किटचे वाटप

नांदेड - नांदेड वाघाळा महानगर पालिकेतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छतेचे कामे करतांना त्यांच्या कामांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढावावी या करीता, स्वच्छतेच्या कामा विषयी व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत १२ नोव्हेंबर रोजी प्रशिक्षण देण्यात आले. शहरातील स्वच्छता अबाधित ठेवण्याचा भार हा स्वच्छता व आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांवर असतो, स्वच्छता कर्मचाऱ्यांची स्वच्छतेचे कामे करतांना त्यांचा कामांची गुणवत्ता व कार्यक्षमता वाढावी याकरीता, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, छ.संभाजी नगर या संस्थेकडुन महानगरपालिके मार्फत दि. १२ व १३ नाव्हेंबर रोजी असे दोन दिवस प्रभाग निहाय प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे.




सदरील प्रशिक्षणाचे अध्यक्ष, डॉ. महेशकुमार डोईफोडे, आयुक्त, नांवामशनपा नांदेड यांचे हस्ते उद्धाटन करण्यात आले. प्रशिक्षण उद्धाटनानंतर आयुक्त यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना स्वच्छता व स्वच्छता कामाचे महत्व व स्वच्छतेचे काम करीत असतांना घ्यावयाची काळजी या बाबत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच, आयुक्त यांच्या हस्ते प्रतिनीधीक स्वरुपात स्वच्छता कर्मचाऱ्यांना पिपिई किट चे वितरीत करण्यात आले. प्रशिक्षण उद्धटना कार्यक्रमास, गिरीष कदम,अतिरीक्त आयुक्त नांवामशनपा नांदेड, नितीन गाढवे, गुलाम मो. सादेख सहाय्यक आयुक्त, नांवामशनपा नांदेड, व ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, छ.संभाजी नगर या संस्थेचे विभागिय संचालक अभिजीत गाडगे व त्यांचे सहकारी हे उपस्थित होते.

सदरील प्रशिक्षणात संबधित संस्थेकडुन स्वच्छता साहित्य कसे धरावे, ते कसे वापरावे, त्यांची निगा राखणे, स्वच्छता कामे करतांना कोणती काळजी घ्यावी, पिपिई साहित्यांची माहिती- महत्व- वापरकचरा विलगीकरण, खउढ बेसड टठ कोड स्कॅनिंग प्रणालीचे महत्व व कार्यवाही, कचरा संकलन करतांना नागरिकांशी संवाद कसा करावा, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे, व जीवनमानात सुधारणा व सुखकर होणे हेतुने आर्थिक बचत करणे, व्यसणाचे दुष्परीणाम व तोटे, कुटुंबियांच्या आरोग्याकडे लक्ष देणे अशा विविध विषयांवर मार्गदर्शन, माहिती, प्रात्याक्षिके दाखवुन प्रशिक्षण देण्यात आले. तसेच सदरील प्रशिक्षणाअंती मा. गुलाम मो. सादेख सहाय्यक आयुक्त, नांवामशनपा नांदेड यांचे हस्ते प्रशिक्षणास उपस्थीत असलेल्या सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांना पिपिई किट चे वितरीत करण्यात आले. सदरील प्रशिक्षणास स्वच्छता निरीक्षक प्रभाग क्र. १ ते १० व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) विभागाचे कर्मचारी उपस्थीत होते.




# नानक साई फाऊंडेशन चा ५ वा संत नामदेव जीवन गौरव पुरस्कार सोहळा नांदेड येथे चैतन्यनगर शिवमंदिर परिसरात मोठ्या उत्साहात संपन्न .

नांदेड /प्रतिनिधी

नांदेड भूषण सत्कार योग श्रीमान संत बाबा बलविंदरसिंघ महाराज (महान संत, गुरुद्वारा लंगर साहिब नांदेड) यांच्या हस्ते आणि नांदेड चे लोकप्रिय खासदार प्रा रवींद्र चव्हाण, आ बालाजी कल्याणकर, माधवराव पटणे अध्यक्ष,शिवमंदिर ट्रस्ट चैतन्यनगर नांदेड, माजी महापौर आनंद चव्हाण, ज्येष्ठ साहित्यिक प्रा डॉ जगदीश कदम,जिल्हा काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष राजेश पावडे, जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष संभाजीराव धुळगंडे, किशोर भवरे,ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते धर्मभुषण दिलीप ठाकूर, प्रा एस टी बोखारे,रंगनाथराव वाघ, मनोहर पाटील भोसीकर,नानक साई फाऊंडेशन चे उपाध्यक्ष सर्व सुभाष बल्लेवार,तुलसीदास भुसेवार,जी नागय्या, विनायक पाथरकर,सेक्रेटरी सौ प्रफुल्ला पंढरीनाथ बोकारे, संयुक्त सचिव श्रेयस कुमार बोकारे यांच्या सह आपल्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला.. उपस्थित राहून सहकार्य केले त्याबद्दल पंढरीनाथ बोकारे आम्ही आपल्या चेअरमन नानाक साई फाऊंडेशन नांदेड च्या वतीने सर्वांचे आभारी आहोत .

# नरसी सर्कल व मुगाव गण साठी इच्छुक उमेदवार सौ.तृष्णा तोटरे जिल्हा परिषद गट अवकाश पा.धुप्पेकर पंचायत समिती गाव भेटीला

नायगाव /प्रतिनिधी

प्रा मनोहर तोटर सर अवकाश पाटिल धुप्पेकर, आनंदराव पाटिल बावणे, परमेश्वर पा. धानोरकर, सुहास पाटील टाकळीकर यांनी नरसी सर्कल मधील भोपाळा गाव भेट दौरा नरसी सर्कलचे भाजपचे इच्छुक उमेदवार सौ तृष्णा मनोहर तोटरे नरसी सर्कल मधील भोपाळा)येथील ग्रामस्थांशी स्नेह संवाद साधून गाठी-भेटी घेतल्या आणि आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने सकारात्मक चर्चा केली आणि खंबीरपणे पाठीशी उभे राहण्याचे आवाहन केले यावेळी समस्त गावकऱ्यांनी अतिशय जिव्हाळा जपत उत्स्फूर्तपणे स्वागत,सन्मान केला.यावेळी गावातील प्रमुख भाजपाचे कार्यकर्ते नरसी सर्कल मधील सर्व सहकारी,ग्रामस्थ मोठया संख्यने उपस्थित होते.जनतामाझीमीजनतेचा स्नेहसंवाद आपली च्या माणसासाठी हितगूज करण्यात आले .

# मांजरम येथे स्वामी वैष्णवानंद पुण्यतिथीनिमित्त १५ ते १७ नोव्हेंबर धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

नायगाव /प्रतिनिधी

मांजरम येथील स्वामी वैष्णवानंद संस्थानात दरवर्षीप्रमाणे स्वामी वैष्णवानंद यांच्या पुण्यतिथीनिमित्त १५ ते १७ नोव्हेंबर रोजी सांस्कृतिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या मध्ये नामवंत कीर्तनकार,व प्रतिभावान कलावंत या सोहळ्यात सहभागी होणार असल्याची माहिती स्वामीजींचे वंशज बाळासाहेब पांडे मांजरमकर यांनी दिली.

कार्तिक वद्य एकादशी दि. १५ नोव्हेंबर शनिवार रोजी सकाळी स्वामींच्या समाधीचे पूजन, रात्री ७ वाजता वे. शा.सं. रमेश गुरु राहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक सोहळा, रात्री ९ ते १२ विठ्ठलेश्वर भजनी मंडळ, जिजामाता महिला भजनी मंडळ, महात्मा बसवेश्वर भजनी मंडळ, हनुमान सेवा दल, गुरुदेव सेवा भजनी मंडळ मांजरम यांच्या भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

कार्तिक वद्य द्वादशी १६ नोव्हेंबर रविवार रोजी स्वामीच्या पुण्यतिथीचा सोहळा, सकाळी प्रा. भूषण कुलकर्णी व श्रीनिवास पांडे यांच्या हस्ते समाधी पूजन, दुपारी १ ते ३ स्वामीच्या पुण्यतिथीचा सोहळा वैदीय कार्यक्रमाने साजरा होईल. सर्वश्री वे.शा.सं. रमेश गुरु राहेरकर, धनंजय महाराज कापसिकर,संतोष महाराज राहेरकर, बाळासाहेब कुलकर्णी बरबडेकर ,उमेश नायगावकर, यांच्या मार्गदर्शनाखाली वैदिक विधी होणार आहे. दुपारी ३ ते ४ ह.भ.प. महंत श्री विशुद्धानंद महाराज सिद्धतीर्थ धाम हळदा तालुका कंधार यांचे प्रवचन व दर्शन सोहळा होईल या नंतर ह.भ.प. बाबू गुरु शिराढोणकर यांचे स्वामीच्या गुलालाचे भजन, त्यांना हार्मोनियमची साथ अनंतराव मंगनाळे, गायन सुधाकर कुलकर्णी चोराखळीकर, विनायक पाटील शिंदे, परमेशवर केते महाराज, विकास भूरे महाराज, गोविंद विभुते,तबला साथ हरिप्रसाद पांडे मांजरमकर, मृदंग साथ बालू महाराज पांडे यांची राहणार आहे.

रात्री ७ ते ९ आंतरराष्ट्रीय ख्यातीची बाल गायिका कु. वीरा गणेश हाके या बालिकीची अभंगवाणी संताची हा कार्यक्रम ,रात्री ९ ते ११ रेडिओस्टार विनोदाचार्य ह.भ.प. चंद्रकांत महाराज लाठकर यांचे कीर्तन, रात्री ११ ते १२ दरम्यान प्रसिद्ध तबलावादक




तथा तळवळकर गुरुजी यांचे शिष्य प्रशांत गाजरे नांदेड यांचे पट शिष्य अभिषेक देशपांडे व हरिप्रसाद पांडे यांचे तबलावादन, १२ ते १ दरम्यान भजनसम्राट विश्वनाथ भोगले यांचा 'भजनसंध्या' व मास्टर ईशांत नांदेडकर (कोकण )यांचा भारुड व गौळणीचा नृत्याविष्कार कार्यक्रम साजरा होणार आहे. रात्री जागर भजना चा कार्यक्रम होणार असून यामध्ये संगीत अलंकार प्राप्त, शंकर बिरादार, प्रा. माधव किन्हाळकर, कु .भाग्यश्री पांडे, त्र्यंबक अप्पा स्वामी, पवन गादेवार, रमेश पा. खैरगावकर, बालाजी चौधरी, मनोज आरगुलवार, शरद पा. कोलंबीकर, शंकर पाटील मुगावकर, श्याम पाटील नरंगलकर, रावसाहेब पाटील, डॉ. मनोहर तेलंग, दत्ता पाटील ,व कोलंबी, नरंगल, मोकासदरा, मांजरम वाडी गोधमगाव येथील भजनी मंडळीचे कलावंत हजेरी लावणार आहेत. तबला साथ नामदेव पांचाळ, संजय देशपांडे, मृदंग विश्वेश्वर जोशी कोलंबीकर, ऋषिकेश बेळीकर, ढोलकी सूर्यकांत पातावार, ढोल ज्ञानेशवर बैस, ट्रीबलसाथ हरिप्रसाद पांडे, बासरी वादन विजय द्रोणाचार्य, हार्मोनियम गणेश हाके सर,व मारोती कोंडमंगल यांची साथ राहणार आहे.

कार्तिक वद्य त्रयोदशी १७ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता वे.शा.सं. संतोष गुरु राहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेदांत राहेरकर यांचा स्वामीच्या समाधीला अभिषेक, नंतर स्वामीच्या पादुका व प्रतिमा यांची मांजरम नगरीतून मुख्य रस्त्यावर पालखी मिरवणुकीचा सोहळा होणार आहे. या मध्ये रामकीशन पांचाळ नरसीकर, विश्वनाथ भोगले नांदेडकर, शाहीर सूर्यकांत पातावार यांचा भारुडी भजनाचा कार्यक्रम होईल. सकाळी १० वा. स्वामीचे वशंज हरिप्रसाद पांडे, अर्णव देसाई ,यांच्या हस्ते दहीहंडी फोडून काल्याच्या प्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.

# स्वारातीम विद्यापीठाच्या विद्यार्थिनीला राष्ट्रीय स्तरावरील 'महाकुंभ इनोव्हेशन समिट'मध्ये पारितोषिक

नांदेड /प्रतिनिधी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या विद्यार्थिनीने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विद्यापीठाचा गौरव वाढविला आहे. एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई येथे दि. ९ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या 'महाकुंभ इनोव्हेशन समिट' या राष्ट्रीय स्पर्धेत विद्यापीठाची विद्यार्थिनी भूमिका राठोड हिने आपल्या 'सर्वायकल कॅन्सर किट' या नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पासाठी सांत्वन पारितोषिक प्राप्त केले.

या स्पर्धेत भूमिकाला रु. १०,०००/- नगदी पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. महिलांमधील सर्वायकल कॅन्सरचे लवकर निदान करण्यासाठी उपयुक्त ठरणारी ही किट ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि सामाजिकदृष्ट्या उपयोगी संकल्पना असल्याचे परीक्षकांनी नमूद केले.

महाकुंभ इनोव्हेशन स्पर्धेत विद्यापीठातील एकूण १५ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला, ज्यामध्ये खुशीकौर कुमार, गायत्री देशमुख, तेजबिंदरकर परिहार, ऐश्वर्या येडे, गीता कुऱ्हे, पूजा खानजोडे, स्वप्नजा नरोटे, अश्विनी चंपाफुले, श्रुती घुगे, श्रुती गलाडे, भूमिका राठोड, वैष्णवी बनकर, पठाण सदरा, पायल राठोड व वसुंधरा कुटे यांचा समावेश होता.



या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डि. डी. पवार, नवोक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. शैलेश वाढेर, आयक्युएसीचे संचालक डॉ. सुरेंद्र रेड्डी, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील व जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम यांनी सर्व विद्यार्थिनींना शुभेच्छा देत अभिनंदन केले.

या यशासाठी मार्गदर्शक डॉ. सुनील हजारे, न्यू मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोलीचे प्राचार्य डॉ. एन. एस. सोळंके, व डॉ. कोल्हे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. तसेच डॉ. चैतन्य यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी विद्यापीठात नवोन्मेष, स्टार्टअप आणि संशोधन संस्कृतीला चालना देण्यासाठी उचललेली पावले या यशातून फलद्रूप होत असल्याचे नमूद केले. भूमिका राठोड व डॉ. सुनील हजारे यांनी केवळ स्वतःचा आणि विद्यापीठाचा सन्मान वाढविला नाही, तर महिलांच्या आरोग्य संरक्षणासाठी उपयुक्त अशा नवतंत्रज्ञानाच्या सामाजिक गरजेची जाणीव अधोरेखित केली, असे त्यांनी सांगितले.

# ईव्हीएम मशीनची एफ एल सी तहसील कार्यालयात पार पडली - भोकर



भोकर /प्रतिनिधी

आगामी नगर परिषद व जिल्हा परिषद निवडणुका पारदर्शक आणि सुरळीत पार पडाव्यात यासाठी तहसील कार्यालयात ईव्हीएम मशीनची फर्स्ट लेवल चेकिंग प्रक्रिया पार पडली, या तपासणीसाठी मास्टर ट्रेनर आणि तलाठी यांनी सक्रिय सहभाग घेतला तसेच झोनल अधिकारी उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली एफ एल सी दरम्यान मशीनची बटणे, सील तसेच तांत्रिक घटकाची बारकाईने तपासणी करण्यात आली. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनानुसार सर्व मशीनची चाचणी घेण्यात आली .मशीन सुस्थितीत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले या तपासणीमुळे आगामी निवडणुकीसाठी प्रशासनाने आवश्यक तयारी पूर्ण केल्याचे तहसील प्रशासनाकडून सांगण्यात आले. तहसीलदार व निवडणूक निर्णय अधिकारी विनोद गुंडमवार यांनी सांगितले की एफएलसी प्रक्रियेमुळे मतदानाचा विश्वास वाटतो आणि निवडणुकीतील पारदर्शकता सुनिश्चित होते.